J.K. FURNISHING
Sleepwell Gallery
Your Own Mattress Store
• Foam Mattress • Pillow, Cushions
• Coir Mattress • Sofa Fabric
Bhaskar Jawarkar
9146099196 / 9422190280
Aditya Jawarkar
9689509334
Near Best Cinema, Jaistambh Chowk, Amravati. Tel. 0721-2675898

पश्चिम विदर्भातील सर्वाधिक अग्रगण्य सायं दैनिक

# सिटी न्यूज सुपरफास्ट

अकोला • वर्ष १५ • अंक ३५४ • शुक्रवार, दि. ३ जुलै २०२६ • मूल्य ५ • पृष्ठे ८

RNI No.- MAHMAR/2012/49642 Postal Regn. No. AKL DN/283/2024-26 Web. http://epaper:citynewssuperfast.com

## » थोडक्यात

### ११ बड्या अधिकाऱ्यांचे तडकाफडकी निलंबन!

नाशिक : एसटी महामंडळाच्या नाशिक आणि अमरावती विभागांतर्गत सुरू असलेल्या ढिसाळ, मनमानी आणि भ्रष्ट कारभाराचा पर्दाफाश करत परिवहन मंत्रालयाने आतापर्यंतची सर्वात मोठी आणि धडक कारवाई केली आहे. प्रवाशांची लूट आणि महामंडळाचे अतोनात आर्थिक नुकसान करणाऱ्या तब्बल ११ बड्या अधिकाऱ्यांना तडकाफाडकी निलंबित करण्यात आले आहे. निलंबित करण्यात आलेल्यांमध्ये वर्ग १ श्रेणीतील ३ उच्चपदस्थ अधिकाऱ्यांसह वर्ग २ मधील ८ अधिकाऱ्यांचा समावेश असल्याने संपूर्ण प्रशासकीय वर्तुळात तीव्र खळबळ उडाली आहे. कामात गंभीर हलगर्जीपणा केल्याचा ठपका ठेवत या अधिकाऱ्यांवर निलंबनाची कुऱ्हाड चालवली आहे.

---

### बिश्नोई गँगचा एक राजस्थानमधून ताब्यात

पुणे : पुण्यात बिश्नोई गँगकडून करण्यात आलेल्या गोळीबार प्रकरणात एक जणाला ताब्यात घेण्यात आले आहे. पोलिसांनी राजस्थानमध्ये ही कारवाई केली आहे. बिश्नोई गँगमधील एका सदस्याला पुणे पोलिसांच्या गुन्हे शाखेने ताब्यात घेतले तर राजस्थानमधील हनुमानगड येथून पवन राम या तरुणाला ताब्यात घेतल्याची माहिती आहे. सध्या पोलीस या तरुणाकडून अधिक माहिती घेत तपास करत आहे. पुण्यात बिश्नोई गँगकडून वारंवार व्यापाऱ्यांसह राज्यातील अनेकांना खंडणीसाठी धमकीचा फोन येत असल्याच्या प्रकरणाने खळबळ उडाली आहे.

## वडेट्टीवार यांच्या आरोपांमुळे खळबळ; 'SIT' चौकशीची मागणी



# कोट्यवधींच्या गुंठेवारी, भूखंड घोटाळ्यात कोण कोण ?



प्रतिनिधी दि. ३ जुलै

**अकोला / मुंबई :** सिटी न्यूज सुपरफास्ट आणि आर आर सी ने ओपन स्पेस घोटाळा उजेडात आणल्यानंतर अकोल्यातील ओपन स्पेस व भूखंड घोटाळ्याचा मुद्दा विधीमंडळात गाजला. अकोला महापालिका क्षेत्रातील ४० खुले भूखंड गायब झाले आहेत. भूखंड माफियांकडून त्या जागा हडपण्यात आल्याचा गंभीर आरोप काँग्रेसचे विधिमंडळ पक्षनेता आ. विजय वडेट्टीवार यांनी विधानसभेत केला.

त्यांनी अकोल्याच्या लोहिया यांचे नाव घेत ( शिट नंबर २९ (अ)) या घोटाळ्याकडे अंगुली निर्देश केले आहे. ओपन स्पेस घोटाळ्याच्या संपूर्ण प्रकरणाची 'एसआयटी'स्थापन करून चौकशी करण्याची मागणी आता होत आहे. नझुल लँड, इंडस्ट्रीयल झोन आणि फ्लड झोनमधील नियमांना केराची टोपली दाखवत महापालिका आणि भूमी अभिलेख विभागाच्या संगनमताने हा कोट्यवधींचा घोटाळा झाल्याचा संशय व्यक्त केला जात आहे.

या आरोपानंतर आता महापालिकेचे तत्कालीन नगररचनाकार तट्टे आणि संदीप गावंडे यांची चौकशी होणार का, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

### चौकशीसाठी एस आय टी का आवश्यक

» या संपूर्ण घोटाळ्यात नझुल विभाग, महसूल विभाग, भूमी अभिलेख आणि महानगरपालिका या चारही यंत्रणांचे लागेबांधे असल्याचे बोलले जात आहे. महापालिकेचे नगररचनाकार तट्टे आणि संदीप गावंडे यांच्या कार्यकाळातील या परवानग्या असल्याने, वडेट्टीवार यांच्या आरोपांनंतर या दोन्ही अधिकाऱ्यांची चौकशी होणार का? याकडे राज्याचे लक्ष लागले आहे. इतकेच नाही तर नझुल विभाग, महसुल विभाग, भूमी अभिलेख विभागातील तत्कालिन सर्व अधिकाऱ्यांच्या चौकशीची गरज व्यक्त केली जात आहे. ही चौकशी करण्यासाठी एस आय टी स्थापन करण्याची




### इंडस्ट्रीयल ते गुंठेवारी: नियमांची सर्रास पायमल्ली?

» मिळालेल्या माहितीनुसार, एस. एस. जीन शिट नंबर २९ (अ) ( सरकारी बगिच्या मागील बाजू) मधील जमिनीबाबत हा वाद उफाळून आला आहे. मुळात 'इंडस्ट्रीयल झोन' (औद्योगिक क्षेत्र) असलेल्या या जागेचा 'गुंठेवारी'पर्यंतचा प्रवास कसा झाला, हा मोठा संशोधनाचा विषय बनला आहे. शासकीय मालकीची 'नझुल लँड' असतानाही तिची बेकायदेशीरपणे गुंठेवारी कशी करण्यात आली, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. धक्कादायक बाब म्हणजे, सेल्स टॅक्स आणि सहकारी बँकांच्या अवसायनातील बोजा या जमिनींवर चढविणे आवश्यक असतानाही, तो चढवला गेला की जाणीवपूर्वक दडपला गेला, याची चौकशी आता आवश्यक बनली आहे.

### फ्लड झोनमध्ये टोलेजंग इमारतींना परवानगी कशी?

» नदीपात्र किंवा पूर नियंत्रण क्षेत्र असतानाही या भागात मोठ्या टोलेजंग इमारतींच्या बांधकामाला परवानगी कोणी दिली ? असा थेट सवाल उपस्थित केला जात आहे. नियमानुसार या इमारतींना 'बिल्डिंग कंपलिशन सर्टिफिकेट' कोणी आणि कोणत्या आधारावर दिले, हादेखील तपासाचा मुख्य मुद्दा आहे. जर ते दिले नसतील तर तत्काळ थांबविण्याची गरज आहे. विकासकाने नियम धाब्यावर बसवून 'ओपन स्पेस' (मोकळी जागा) आणि 'पब्लिक युटिलिटी' (सार्वजनिक सोयी-सुविधा) यासाठी आवश्यक असलेली जागा सोडलीच नसल्याचे समोर येत आहे. इतकेच नाही तर रस्ते देखील निमुळते केले आहे. जे नियमानुसार नाही अशी ओरड कायम आहे. नियमांनुसार रस्ते ९ मीटरचे असणे आवश्यक होते की १२ मीटरचे, यातही मोठा नियमांचा खेळ झाल्याचे दिसते.

### कायद्याचा गैरवापर आणि एफएसआय-टीडीआरचा खेळ

» भूमी अभिलेख विभागाने केलेल्या 'एरिया करेक्शन' (क्षेत्र दुरुस्ती) मध्ये नेमके किती बदल झाले आणि ते कोणाच्या फायद्यासाठी केले गेले, हा मोठा संशयाचा बाब आहे. भूमी अभिलेख विभागाच्या कलम १५५ आणि १०६ या कायद्यांचा सर्रास गैरवापर झाल्याचा आरोप असून, हा गैरवापर कोण तपासणार? असा प्रश्न वडेट्टीवार यांनी केला आहे. तसेच, या प्रकल्पात वापरण्यात आलेल्या एफ.एस.आय. आणि टी.डी.आर. च्या हिशोबात मोठी तफावत असून याचा हिशोब कोण देणार, अशी विचारणा केली जात आहे.

**नियम डावलून जागा घश्यात घातल्या :»** शीट क्र. २९ ए ही शासनाची जिनिंगची जागा होती, त्याबाबतही तेच घडले. किती लोकांची नावे घ्यावी, या जागा हडपणाऱ्यांची संपूर्ण यादीच माझ्याकडे आहे, असे विजय वडेट्टीवार म्हणाले. लोहिया नावाच्या व्यक्तीने शासन नियम डावलून ही जागा मोठ्या प्रमाणात हडपली आहे. याला महापालिकेतील कंत्राट कर्मचारी संदीप गावंडे व त्याच्या सोबतच्या अधिकाऱ्यांनी ही जागा अनधिकृत गुंठेवारी करून त्याच्या घशात घातली, असा आरोपही वडेट्टीवार यांनी केला. अकोला शहरात खुले भूखंड हडपण्याची मोठी समस्या आहे. मात्र, त्यावर कारवाई होत नसल्याचे चित्र आहे. विरोधी पक्षनेत्यांच्या या आक्रमक पवित्र्यामुळे प्रशासकीय वर्तुळात प्रचंड खळबळ उडाली असून, सरकार यावर एसआयटी चौकशीचे आदेश देते की नाही, हे पाहणे महत्त्वाचे ठरेल. या सर्व प्रकरणात महापालिका, भूमिअभिलेख, नजुल, तहसिल, उपविभागीय कार्यालय यातील सिंडीकेटचा तपास राज्य सरकारने केल्यास मोठा घोटाळा बाहेर येईल.




# राम मंदिर लुटारूंना 'अब हिंदू माफ नही करेगा'!

## ▸▸ उध्दव ठाकरेंनी भाजपाविरोधात फुंकले रणशिंग ▸▸ 5 जुलैला दादरमध्ये 'रामरक्षा' आंदोलन



प्रतिनिधी ३ जुलै

**मुंबई :** जसं एकदा अटलबिहारी वाजपेयी म्हणाले होते की 'अब हिंदू मार नही खायेगा', तसे मी म्हणतोय की, मंदिर लुटारूंना 'अब हिंदू माफ नहीं करेगा'. जे जे मंदिर लुटत आहेत त्यांना हिंदू त्यांची जागा दाखवल्याशिवाय राहणार नाही. त्याची सुरुवात आम्ही येत्या रविवारपासून करतो आहोत. येत्या रविवारी पाच तारखेला दादर येथे हनुमान मंदिरासमोर तमाम हिंदूंना मी आमंत्रित करत आहे. पक्ष वगैरे न बघता, जे जे हिंदू आहेत, ज्यांना ज्यांना रामाच्या मंदिरात होत असलेली चोरी ही सहन होत नाहीये, त्यांनी एकत्र यावे.

अयोध्येतील श्रीराम मंदिरातील दानपेटी आणि देणगी निधीच्या कथित अपहाराच्या प्रकरणावर शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी मुंबईत एक जाहीर पत्रकार परिषद घेतली. यावेळी त्यांनी भारतीय जनता पक्षावर अत्यंत आक्रमक शब्दांत जोरदार हल्लाबोल केला. राम मंदिराच्या निधीवर भाजपने दरोडा टाकल्याचा थेट आरोप करत उद्धव ठाकरे यांनी भाजपविरोधात थेट रणशिंग फुंकले आहे. उद्धव ठाकरे म्हणाले की, 'आज भारतीय जनता पक्षाची सत्ता आली आहे; पण भारतीय जनता पक्षाचे मूळ जे आहे, ते ज्या आंदोलनातून उभे राहिले, त्यात देशातील तमाम हिंदू सहभागी होता. तो काळ आजही आपल्यापैकी अनेकांना आठवत असेल. कारसेवकांवर झालेले अत्याचार, गोध्राचे हत्याकांड, अहमदाबादमधली दंगल आणि अगदी मुंबईमध्ये सुद्धा जे काही घडले होते, त्याच्यामध्ये हिंदूंनी बरंच काही सोसलं होतं. त्या सगळ्यावर मी असं म्हणेन की, भांडवल करून भारतीय जनता पक्ष जो हे आंदोलन सुरू होण्याच्या आधी संपूर्ण देशामध्ये त्याचे फक्त दोनच खासदार होते आणि 'गांधीवादी समाजवाद' हा त्यांनी अंगी कारलेला एक कार्यक्रम होता, तो कार्यक्रम सोडून ते हिंदुत्वाकडे वळले, राम मंदिराच्या मुद्याला हात घातला.

### 'ऑपरेशन राम मंदिर' भाजप करणार काय?

आज देशामध्ये भारतीय जनता पक्षाच्या काळात राम मंदिराचा मुद्दा वेगळया एका गोष्टीमुळे चर्चेला जातोय, हे दुर्दैव आहे. राजकीय पक्ष तोडले जात आहेत, आमदार गोव्यात किंवा इतरत्र पळवले जात आहेत, खरेदी-विक्री होते आहे आणि याला 'ऑपरेशन' नाव दिले जाते. मग आता ऑपरेशन राम मंदिर भाजप करतंय का? हा एक महत्त्वाचा मुद्दा आहे. राम मंदिरावरती दरोडा तर टाकला जातोय, टाकला गेलाय; त्याचे पुरावे सुद्धा दिले गेले आहेत, काही जणांचे म्हणणे आहे की चोरीचा पैसा इतर पक्ष फोडण्यासाठी वापरला जातोय, हे फार गंभीर आहे,' असा आरोप त्यांनी केला.

### शहरा-शहरात, खेड्यापाड्यात आंदोलन व्हावे!

यानंतर प्रत्येक ठिकाणी राज्यभर, जिल्ह्यामध्ये, शहरांमध्ये आणि अगदी खेड्यापाड्यात सुद्धा जिथे जिथे राम मंदिर असेल, हनुमान मंदिर असेल, तिथे हे सर्व हिंदू, सर्व रामभक्त एकत्र येतील. मी तर म्हणेल आता वारीची सुरुवात होते आहे, अगदी वारकरी सुद्धा या राम मंदिराच्या लुटीविरोधात ज्यांच्या मनात आग आहे, ज्यांच्या मनात राग आहे, ते सगळे एकत्र होऊन या भारतीय जनता पक्षाला याचे उत्तरदायित्व स्वीकारायला लावल्याशिवाय राहणार नाहीत,' असे देखील उद्धव ठाकरे म्हणाले.

# शुभांगी पाटील आज शिंदे गटात प्रवेश करणार!

## ठाकरे गटाला उत्तर महाराष्ट्रात मोठा धक्का, सत्यजीत तांबेंना केले होते पराभूत





प्रतिनिधी ३ जुलै

**नाशिक :** गेल्या काही दिवसांपासून शिवसेना ठाकरे गटाला मोठी गळती लागल्याचे चित्र आहे. आता उत्तर महाराष्ट्रात शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाला एक मोठा धक्का बसला आहे. ठाकरे पक्षाच्या उत्तर महाराष्ट्राच्या उपनेत्या शुभांगी पाटील आज मुंबई येथे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत शिवसेना शिंदे गटात जाहीर प्रवेश करणार असल्याची विश्वसनीय माहिती सूत्रांनी दिली आहे.

गेल्या काही दिवसांपूर्वी त्यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेतली होती, तेव्हापासूनच त्यांच्या पक्षांतराच्या चर्चांना उधाण आले होते. अखेर आज त्यांचा अधिकृत पक्षप्रवेश होणार असल्याचे स्पष्ट झाले आहे. शुभांगी पाटील या शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या उपनेत्या असून, त्यांच्याकडे महिला आघाडीच्या संपर्कप्रमुखपदाची जबाबदारी देखील होती. नाशिक पदवीधर मतदार संघाच्या अत्यंत गाजलेल्या आणि प्रतिष्ठेच्या निवडणुकीत त्यांनी अपक्ष उमेदवार सत्यजीत तांबे यांच्या विरोधात ठाकरे गटाकडून निवडणूक लढवून त्यांना पराभूत केले होते. या निवडणुकीमुळेच त्या संपूर्ण महाराष्ट्रात प्रकाशझोतात आल्या होत्या. आता शुभांगी पाटील ठाकरेंच्या शिवसेनेला 'जय महाराष्ट्र' करणार असल्याने उद्धव ठाकरेंच्या शिवसेनेसाठी हा मोठा धक्का मानला जात आहे.

# १.७५ कोटींचा ८८५ किलो गांजा नष्ट

## ◆ २९ गुन्ह्यांतील अंमली पदार्थाचे बुटीबोरी येथे भस्मीकरण

प्रतिनिधी ३ जुलै

**यवतमाळ:** विशेष मोहिमेअंतर्गत यवतमाळ पोलिसांनी विविध गुन्ह्यांमध्ये जप्त केलेला सुमारे १ कोटी ७५ लाख रुपयांपेक्षा अधिक किमतीचा ८८५.१५९ किलो गांजा नष्ट केला. जिल्ह्यातील २९ गुन्ह्यांमध्ये जप्त करण्यात आलेल्या अंमली पदार्थाचे सर्व कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करून नागपूर जिल्ह्यातील बुटीबोरी येथील महाराष्ट्र एन्व्हायरो पॉवर लिमिटेडमध्ये भस्मीकरण करण्यात आले.



अमली पदार्थ विरोधी टास्क फोर्स, महाराष्ट्र राज्याचे विशेष पोलीस महानिरीक्षक यांच्या निर्देशानुसार एनडीपीएस कायद्यांतर्गत दाखल गुन्ह्यांतील जप्त अंमली पदार्थ नष्ट करण्यासाठी विशेष मोहीम राबविण्यात आली होती. त्यानुसार महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाची परवानगी घेऊन २ जुलै रोजी बुटीबोरी येथील प्रकल्पात पंचांसमक्ष गांजाचे भस्मीकरण करण्यात आले.

नष्ट करण्यात आलेल्या अंमली पदार्थाची सद्य बाजारभावानुसार किंमत १ कोटी ७५ लाख रुपयांहून अधिक असल्याची माहिती पोलिसांनी दिली. या कारवाईमुळे जिल्ह्यातील प्रलंबित गुन्ह्यांतील जप्त अंमली पदार्थांची विल्हेवाट लावण्याची प्रक्रिया पूर्ण झाली आहे. दरवर्षी २६ जून हा दिवस जागतिक अंमली पदार्थ विरोधी दिन म्हणून साजरा केला जातो. अंमली पदार्थांच्या व्यसनामुळे होणारे शारीरिक व मानसिक दुष्परिणाम, तसेच तरुण पिढीमध्ये जनजागृती निर्माण करणे हा या दिवसाचा प्रमुख उद्देश असल्याचे पोलिसांनी नमूद केले आहे.

ही कारवाई ड्रग डिस्पोजल कमिटीचे अध्यक्ष तथा पोलीस अधीक्षक कुमार चिंता, सदस्य अपर पोलीस अधीक्षक अशोक थोरात आणि प्रभारी उपविभागीय पोलीस अधिकारी सुनील हुड यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सतीश चवरे, सहाय्यक पोलीस निरीक्षक मनीष गावंडे आणि त्यांच्या पथकाने ही मोहीम यशस्वीपणे पार पाडली.

# रेसिंग कारमध्येही इथेनॉलचा वापर केला जातो!

## ◆ केंद्रीय मंत्री हरदीपसिंग पुरी; सरकारच्या इथेनॉल मिश्रणाच्या निर्णयाचे समर्थन

प्रतिनिधी ३ जुलै

**नवी दिल्ली :** पेट्रोलमध्ये इथेनॉलचा वापर करण्यावरून सध्या संपूर्ण देशभरात जबरदस्त चर्चा सुरू आहे. या पार्श्वभूमीवर केंद्रीय पेट्रोलियम मंत्री हरदीपसिंग पुरी यांनी सरकारच्या बायोफ्यूल (जैवइंधन) मिश्रणाच्या निर्णयाचे समर्थन केले आहे. मध्य पूर्वेतील संकटामुळे कच्च्या तेलाच्या जागतिक किंमतींमध्ये होणाऱ्या चढ-उताराचा आणि तेल कंपन्यांवरील आर्थिक बोजाचा उल्लेख करत पुरी यांनी यासंदर्भात भाष्य केले आहे.

पेट्रोलमध्ये इथेनॉल मिसळल्याने मायलेज कमी मिळते का? यासंदर्भात सुरू असलेल्या चर्चेवर बोलताना पुरी म्हणाले, 'काही लोकांचे म्हणणे आहे की या इंधनामुळे मायलेज कमी होईल. मात्र, रेसिंग कारमध्येही इथेनॉलचा वापर केला जातो, यामुळे वाहनांची वेग पकडण्याची क्षमता म्हणजे ॲक्सिलेरेशन सुधारते. इंजिनचा आवाज (नॉकिंग) कमी होण्यासही मदत होते. जास्त इथेनॉलच्या मिश्रणामुळे मायलेज किंचितसे कमी होऊ शकते. मात्र, यामागे इतरही अनेक कारणे असू शकतात.





हरदीपसिंग पुरी पुढे म्हणाले, 'सध्या पेट्रोलमध्ये केवळ २० टक्के इथेनॉलच मिसळले जाते. दुसरे म्हणजे, एसआयएएम आणि एआरएआय सह सर्व संबंधित घटकांशी चर्चा केल्यानंतरच आम्ही या टप्प्यावर पोहोचलो आहोत. दरम्यान, विमा कंपन्या यासंदर्भात संरक्षण देणार नाहीत, या अफवेचेही त्यांनी खंडन केले. तसेच, अशी चुकीची माहिती पसरवून कोणाला फायदा होतो, असा सवालही त्यांनी यावेळी केला.

### २५ टक्क्यांचा निर्णय आवश्यक चाचण्यांनंतर!

जर आपण भविष्यात २० टक्क्यांवरून २५ टक्क्यांवर गेलो, तर तसा निर्णय सर्व आवश्यक चाचण्या पूर्ण झाल्यानंतरच घेतला जाईल. भारताच्या वाढत्या बाजारपेठेत इलेक्ट्रिक वाहने, जैवइंधन वाहने, हायब्रिड आणि सीएनजी वाहने अशा सर्व तंत्रज्ञानासाठी प्रचंड वाव आहे. असेही त्यांनी यावेळी स्पष्ट केले.

# अकोल्यात 'गुटखा माफिया' पुन्हा सक्रिय

प्रतिनिधी ३ जुलै

**अकोला:** राज्यात गुटखा विक्रीवर कायदेशीर बंदी असतानाही अकोला जिल्ह्यात गुटखा माफिया पुन्हा एकदा मोठ्या प्रमाणावर सक्रिय झाले आहेत. 'अकोल्यात गुटखा विक्रीला ग्रीन सिग्नल मिळाला आहे,' अशी उघड चर्चा सध्या बाजारपेठेत सुरू असून, कोट्यवधी रुपयांची अवैध उलाढाल प्रशासनाच्या नाकाखाली सुरू झाल्याचे धक्कादायक चित्र आहे. या गुटखा माफियांना नक्की कोणाचे अभय आहे? असा संतप्त सवाल आता अकोलेकर विचारत आहेत. गोदामात कोट्यावधीचा गुटखा साठवल्या गेल्याची माहिती समोर आली आहे. अकोल्याच्या बाहेर गेलेले गुटखा माफियांचे शहरात आगमन झाल्याची माहिती समोर आली आहे.

गेल्या काही दिवसांत शहरात गुटख्याचे भाव अचानक नियंत्रणात आले असून पुरवठा सुरळीत झाला आहे. विशेष म्हणजे, अन्न व औषध प्रशासन आणि स्थानिक पोलिसांकडून केवळ छोट्या पानटपऱ्यांवर वरवरची कारवाई करून 'काम दाखवले' जात आहे. मात्र, शहरात कोट्यवधी रुपयांचा गुटखा आणणारे मुख्य पुरवठादार आणि बडे व्यावसायिक मात्र सुरक्षित आहेत. त्यामुळे तपास यंत्रणांच्या या दुटप्पी भूमिकेवर संशय व्यक्त केला जात आहे.

### कोणाच्या 'ग्रीन सिग्नल' मुळे विक्री सुरू ?

#### अन्न व औषध प्रशासनाची 'पार्टनरशिप' की पाठिंबा?

एकीकडे तरुण पिढी व्यसनाच्या गर्तेत ढकलली जात असताना, दुसरीकडे अधिकारी वर्ग मात्र सुस्त आहे. स्थानिक अन्न व औषध प्रशासनातील काही अधिकाऱ्यांचा या गुटखा माफियांना थेट पाठिंबा आहे की यात काही मोठी 'पार्टनरशिप' (आर्थिक साठेलोट) आहे? अशी शंका घेण्यास वाव आहे. कारण, मुख्य गोदामांची माहिती असूनही तिथे धाडी का टाकल्या जात नाहीत, हा मोठा प्रश्न आहे. बंदी असलेला गुटखा उघडपणे विकण्याची हिंमत माफियांना कोणामुळे आली ?, गुटख्याचे भाव अचानक नियंत्रणात येणे म्हणजेच शहरात प्रचंड साठा उपलब्ध झाला आहे. आता या गुटखा माफियांच्या मुसक्या आवळण्यासाठी तपास यंत्रणा आणि अन्न व औषध प्रशासनाचे वरिष्ठ अधिकारी कोणती पावले उचलतात, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. केवळ कागदोपत्री कारवाई न करता, गुटख्याची मुख्य गोदामे उद्ध्वस्त करण्याची मागणी आता जोर धरत आहे.

# शनिवारी बडनेरा-अमरावती मार्ग वाहतुकीसाठी बंद

प्रतिनिधी ३ जुलै

**अमरावती :** अमरावती येथील पादचारी उड्डाणपुलाच्या स्टील संरचनेच्या कामामुळे वाहतुकीत मोठा बदल करण्यात आला आहे. यादरम्यान बडनेरा-अमरावती राज्य महामार्ग (क्र. ३०४) वाहतुकीसाठी पूर्णपणे बंद ठेवण्यात येणार आहे. वाहनचालकांनी गैरसोय टाळण्यासाठी प्रशासनाने जाहीर केलेल्या पर्यायी मार्गांचा वापर करावा, असे आवाहन वाहतूक पोलिसांकडून करण्यात आले आहे. ४ जुलै रोजी रात्री ११:३० वाजेपासून ते ५ जुलै रोजी सकाळी ६:०० वाजेपर्यंत हा मार्ग पूर्णपणे बंद असेल. बडनेराकडून अमरावतीच्या दिशेने जाणारी वाहने ही अकोला बायपास मार्गे सुपर एक्सप्रेस हायवे मार्गे मेघे कॉलेज चौक ते कोंडेश्वर टी-पॉइंट मार्गे अमरावतीत जातील. अमरावतीकडून बडनेराच्या दिशेने जाणारी वाहने ही अटलामास गेट ते बायपास मार्गे बाहेर निघतील. वाहतूक पोलिसांनी नागरिकांना व वाहनचालकांना या पर्यायी मार्गांचा वापर करून प्रशासनाला सहकार्य करण्याचे आवाहन केले आहे.

# एसटीची ई-बस चोरली!

प्रतिनिधी ३ जुलै

**नागपूर :** उपराजधानीतील इमामवाडा डेपोतून गुरुवारी मध्यरात्री ३:३० वाजताच्या सुमारास २०हून अधिक गुन्हे दाखल असलेल्या तेलंगणातील कुख्यात चोरट्याने एसटी महामंडळाची 'शिवाई' ई-बस चोरून पळवून नेल्याची धक्कादायक घटना घडली. आगारामध्ये १४ कर्मचारी उपस्थित असतानाही सुरक्षारक्षकाच्या कमालीच्या गाफीलपणामुळे आरोपीने बस डेपोबाहेर काढली. मात्र, बसची चार्जिंग संपली. हायटेक ट्रॅकिंग सिस्टीम आणि नागपूर-अमरावती पोलिसांच्या सतर्कतेमुळे अमरावतीच्या राजापेठ येथे आरोपीला चोरीच्या बससह बेड्या ठोकण्यात आल्या.

विष्णू गणपती निलावार (वय २२, रा. हयात नाका, जि. रंगारेड्डी, तेलंगणा) असे अटक करण्यात आलेल्या अट्टल आरोपीचे नाव आहे. ई-बस चोरी केल्यानंतर त्या घेऊन फिरणे आणि बसची चार्जिंग संपल्यानंतर तिचे महागडे टायर व बॅटरी काढून विकण्याची या चोराला सवय आहे, असे पोलिस तपासात पुढे आले आहे. नागपूर शहरातील इमामवाडा डेपोची ई-बस (एम. एच. ४९, बी. झेड-८२५८) मध्यरात्री साडेतीनच्या सुमारास बाहेर काढून आरोपी सुसाट वेगाने अमरावतीकडे निघाला.


# रोनाल्डो आंतरराष्ट्रीय फुटबॉलला करणार अलविदा..!

## फिफा वर्ल्ड कपनंतर घेणार निर्णय : बहिणीने सांगितले ही निरोपाची वेळ!

प्रतिनिधी ३ जुलै

**दिल्ली :** फुटबॉल जगतातील महान खेळाडू क्रिस्टियानो रोनाल्डो चालू विश्वचषकानंतर आंतरराष्ट्रीय फुटबॉलला अलविदा करणार असल्याची माहिती समोर येत आहे. रोनाल्डोची बहीण कालिया अवेरो हिने या वृत्ताला दुजोरा दिला आहे. जेव्हा रोनाल्डो या विश्वचषकात आपला शेवटचा सामना खेळेल, तेव्हा त्याच्या दोन दशकांच्या प्रदीर्घ आणि ऐतिहासिक कारकिर्दीचा शेवट होईल.

मँचेस्टर युनायटेडमधील एक युवा, चपळ खेळाडू ते जगातील सर्वोत्कृष्ट गोलस्कोअरर बनण्यापर्यंतचा त्याचा प्रवास थक्क करणारा आहे. आता या महान प्रवासाचा शेवटचा अध्याय जवळ आला आहे. दरम्यान, फिफा विश्वचषक २०२६ च्या राउंड ऑफ ३२ च्या थरारक सामन्यात पोर्तुगालने क्रोएशियाचा २-१ असा पराभव करत राउंड ऑफ १६ मध्ये प्रवेश केला आहे. या सामन्यानंतर रोनाल्डोने आपल्या निवृत्तीच्या चर्चांवर एक गूढ विधान केले, ज्यामुळे सस्पेन्स आणखी वाढला आहे.



पाच वेळा प्रतिष्ठित 'बॅलन डी'ओर' पुरस्कार जिंकणाऱ्या रोनाल्डोने या विश्वचषकात आतापर्यंत ३ गोल केले आहेत. याशिवाय त्याच्या नावावर अनेक मोठे रेकॉर्ड्स नोंदवले गेले आहेत. तो ४१ वर्षे आणि १४७ दिवस वयाचा असताना विश्वचषक बाद फेरीचा सामना खेळणारा इतिहासातील पहिला खेळाडू ठरला आहे. जगातील ६ वेगवेगळ्या विश्वचषकांमध्ये गोल करणारा तो पहिला पुरुष फुटबॉलपटू आहे. त्याच्याच नेतृत्वाखाली पोर्तुगालने २०१६ मध्ये 'युरो कप' आणि दोनदा (२०१८-१९ आणि २०२४-२५) 'यूईएफए नेशन्स लीग'चे विजेतेपद पटकावले. तो पोर्तुगालसाठी सर्वाधिक सामने खेळणारा आणि सर्वाधिक गोल करणारा कर्णधार आहे.

### बहिणीने केला निवृत्तीचा दावा

रोनाल्डोची बहीण कालिया अवेरो हिने म्हटले की, 'मला एका अत्यंत विश्वासू सूत्राकडून मिळालेल्या माहितीनुसार, हा रोनाल्डोचा शेवटचा प्रवास आहे. त्यामुळे आपण सर्वांनी याचा आनंद घेतला पाहिजे. तो आजच निरोप घेईल असे मला वाटत नाही, पण ती वेळ आता जवळ आी आहे. मला पूर्ण खात्री आहे की हीच निरोपाची वेळ आहे. आंतरराष्ट्रीय स्तरावर २०० हून अधिक गोल करणाऱ्या खेळाडूला शोधणे भविष्यात खूप कठीण असेल.'

### रोनाल्डोचे सस्पेन्स वाढवणारे विधान

बहिणीच्या दाव्याच्या उलट, रोनाल्डोने स्पष्ट केले की त्याने अद्याप आपल्या भविष्याबद्दल कोणताही अंतिम निर्णय घेतलेला नाही. क्रोएशियाविरुद्धच्या सामन्यानंतर तो म्हणाला: 'मी घाईघाईने कोणताही निर्णय घेत नाही. मी काय तो निर्णय हा वर्ल्ड कप संपल्यानंतरच घेईन, आता नाही.' क्रोएशियाविरुद्धच्या या महत्त्वपूर्ण सामन्यात पोर्तुगाल मागे पडला होता, परंतु रोनाल्डोने पेनल्टीवर गोल करत संघाला कमबॅक करून दिले. हा त्याचा फिफा विश्वचषक बाद फेरीतील पहिलाच गोल ठरला.

### १००० गोल करण्याचे उद्दिष्ट

आंतरराष्ट्रीय फुटबॉलमधून निवृत्त झाल्यास रोनाल्डो पोर्तुगालच्या राष्ट्रीय संघाकडून खेळणे थांबवेल. मात्र, तो सौदी अरेबियाच्या 'अल-नासर' या क्लबसाठी व्यावसायिक फुटबॉल खेळणे सुरूच ठेवणार आहे. आपल्या कारकिर्दीत १,००० गोल पूर्ण करण्याचे त्याचे एक मोठे उद्दिष्ट असून, ते पूर्ण करण्यासाठी तो क्लब फुटबॉल खेळत राहील.

# बीडमध्ये सॅफोलाइट रसायनाची भेसळ!

## 'सेफ फूड, सेफ महाराष्ट्र' विशेष मोहीम, तुकाराम मुंढेंच्या कारवाईत खळबळजनक प्रकार उघड

प्रतिनिधी ३ जुलै

**बीड :** दैनंदिन जीवनात दुग्धजन्य पदार्थांची मागणी वाढत असतानाच, बीड जिल्ह्यातून अन्न भेसळीचा एक अत्यंत धक्कादायक आणि खळबळजनक प्रकार समोर आला आहे. अन्न व औषध प्रशासनाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांच्या मार्गदर्शनाखाली सध्या संपूर्ण राज्यात 'सेफ फूड, सेफ महाराष्ट्र' ही विशेष मोहीम राबवली जात आहे. या मोहिमेअंतर्गत बीडच्या शिरूर तालुक्यातील दहीवंडी येथे अन्न व औषध प्रशासनाच्या अधिकाऱ्यांनी टाकलेल्या धाडीत, खवा आणि पनीर अधिक चमकदार व पांढरेशुभ्र करण्यासाठी मानवी आरोग्याला अत्यंत घातक अशा 'सॅफोलाइट' या रसायनाची भेसळ केली जात असल्याचे उघड झाले आहे. या कारवाईदरम्यान अधिकाऱ्यांनी मोठ्या प्रमाणावर अशुद्ध आणि निकृष्ट अन्नपदार्थांचा साठा जप्त करून तो नष्ट केला आहे.

याबाबत मिळालेल्या माहितीनुसार, शिरूर तालुक्यातील दहीवंडी येथील 'जय श्री कृष्णा केक ॲन्ड बर्फी' उत्पादन केंद्रावर अन्न व औषध प्रशासनाच्या पथकाने अचानक छापा टाकला. या केंद्रात तपासणी केली असता, दुग्धजन्य पदार्थ आणि मिठाई तयार करताना त्यात सॅफोलाइट हे रासायनिक द्रव्य मिसळले जात असल्याचे निष्पन्न झाले. तपासणीदरम्यान जप्त करण्यात आलेला तब्बल ३५ हजार ५३५ रुपयांचा मिल्क केक, बर्फी आणि इतर मिठाईचा कच्चा माल अत्यंत कमी दर्जाचा, असुरक्षित आणि भेसळयुक्त असल्याचं निदर्शनास आलं. तसेच तेथील अस्वच्छ आणि अयोग्य साठवणुकीमुळे हा सर्व नाशवंत साठा घटनास्थळीच खोल खड्डा खणून नष्ट करण्यात आला. प्रशासनाने संबंधित उत्पादन केंद्राचा परवाना निलंबित करत पुढील आदेश येईपर्यंत व्यवसाय पूर्णपणे बंद ठेवण्याचे आदेश दिले आहेत. या प्रकरणी संबंधित व्यावसायिक कार्तिक सवाईसिंग राजपुरोहित याच्या विरोधात अन्न सुरक्षा व मानके कायद्यासह 'भारतीय न्याय संहिते'अंतर्गत शिरूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस या प्रकरणाचा पुढील तपास करत आहेत.

सिटी न्यूज अकोला
शुक्रवार दि. ३ जुलै २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

# विवेकानंद प्रज्ञा प्रतिभा विकास केंद्र विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांना उजाळा देईल : प्रा.ललित काळपांडे

प्रतिनिधी ३ जुलै



**आलेगाव :** प्रत्येक विद्यार्थ्यांमध्ये नैसर्गिक अंगभूत सुप्त गुण आहेत, त्या गुणांना योग्य वेळी योग्य मार्गदर्शन मिळाल्यास विद्यार्थ्यांमधील प्रज्ञा आणि प्रतिभेचा विकास निश्चितपणे होऊ शकतो, आणि हेच कार्य स्वामी विवेकानंद प्रज्ञा प्रतिभा विकास केंद्र पुढील काळात पुर्ण करेल असे प्रतिपादन ललित ट्युटोरियल चे संचालक प्रा. ललित काळपांडे यांनी केले. येथे माळी सेवा मंडळ द्वारा संचलित स्वामी विवेकानंद प्रज्ञा प्रतिभा विकास केंद्राच्या शुभारंभ प्रसंगी आयोजित सोहळ्यात प्रमुख अतिथी म्हणून मार्गदर्शन करतांना बोलत होते. येथील संत सावता महाराज समाज भवन केंद्राचा शुभारंभ रामकृष्ण विवेकानंद आश्रम, नवेगांवचे अध्यक्ष स्वामी त्यागानंद महाराज यांचे हस्ते करण्यात आला.कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी माळी सेवा मंडळाचे अध्यक्ष प्रल्हादराव गि-हे होते. प्रमुख अतिथी म्हणून ललित ट्युटोरियल चे संचालक प्रा. ललित काळपांडे, स्वामी विवेकानंद प्रज्ञा प्रतिभा विकास केंद्राचे मुख्य संयोजक तथा विवेकानंद आश्रम हिवरा बु. चे विश्वस्त अशोकराव गि-हे, नुतन विद्यालय आलेगांव चे अध्यक्ष सुभाषजी जैन, पद्माबाई जैन इंग्रजी शाळेचे अध्यक्ष अनिल जैन, माळी सेवा मंडळाचे सचिव मनोहर उगले, सदस्य सर्वश्री भाष्कर गि-हे, सुरेंद्र इंगळे, रामासेठ राखोंडे तसेच जेष्ठ मार्गदर्शक अत्रिनंदन काळपांडे, अत्रिनंदन तायडे, विश्वासराव खुळे, विनोद जैन, यांची प्रमुख उपस्थिती लाभली. माळी सेवा मंडळ सचिव तथा केंद्र संचालक मनोहर उगले यांनी आपल्या प्रास्ताविकातून केंद्र सुरु करण्याबाबतची भुमिका विषद केली. उद्घाटक स्वामी त्यागानंद महाराजांनी विद्यार्थ्यांना संबोधीत करतांना विद्यार्थ्यांनी डॉक्टर, इंजिनीअर, सि.ए., वकील होण्याचं स्वप्न पुर्ण करतांनाच स्वामी विवेकानंदांना अपेक्षीत असलेला सभ्य, आदर्श माणूस बनण्याचं ध्येय घेवून पुढे गेलं पाहिजे. सुभाष जैन यांनी विद्यार्थ्यांना घडविण्यासाठी अभिनव उपक्रम सुरु केल्या बद्दल केंद्राचे मुख्य संयोजक अशोकराव गि-हे यांचेसह संचालक मंडळाचे अभिनंदन केले. पद्माबाई जैन इंग्रजी शाळेचे अध्यक्ष अनिल जैन यांनी या केंद्राने निवडलेल्या तीन आदर्श विद्यार्थ्यांना आपल्या इंग्रजी शाळेत मोफत शिक्षण देण्याची घोषणा केली.

विवेकानंद ज्युनिअर कॉलेज हिवरा आश्रम मधील विद्यार्थी कार्तिक लाकडे याने सुमधूर आवाजात स्वागत गीत गाऊन, तर जय पाठक या विद्यार्थ्यांने तबल्याची साथ संगत करून उपस्थित सर्वांची मने जिंकली. केंद्रातील विद्यार्थी सक्षम गजानन येनकर याने - स्वामी विवेकानंद, स्वरूप राजेश काळपांडे ह्याने - संत सावता महाराज तर कु. खुशी रमेश तायडे हिने - सावित्रीआई फुलेंची वेशभुषा साकारून महापुरुषांचे संदेश उपस्थितांना दिले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी केंद्राचे संचालक शत्रुघ्न बंड, ह.भ.प.जगन्नाथ महाराज तायडे, निलेश गि-हे, व्यवस्थापक राजेश काळपांडे, तांत्रीक सहाय्यक गजानन येनकर, गणेश काळपांडे, इत्यादींनी अथक प्रयत्न केले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन केंद्राच्या विद्यार्थीनी प्रियंका गणेश उमाळे व तन्वी प्रमोद गिऱ्हे यांनी केले, तर आभार,व्यवस्थापक राजेश काळपांडे यांनी मानले.

# भाऊसाहेब फुंडकर शासकीय कृषी महाविद्यालयाच्या विद्यार्थीनीकडून पर्यावरण संवर्धनाचा संदेश



प्रतिनिधी ३ जुलै

**तांदुळवाडी :** महाराष्ट्र्याचे माजी मुख्यमंत्री स्व. वसंतराव नाईक यांच्या जयंतीनिमित कृषी दिनाचे औचित्य साधून भाऊसाहेब फुंडकर शासकीय कृषी महावि?द्यालय, बुलडाणा येथील " च्या विद्यार्थिनींनी तांदुळवाडी येथील जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळेमध्ये वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजन केले. पर्यावरण संवर्धन व वृक्षसंवर्धनाचा संदेश देत हा कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष हरिभाऊ राऊत हे होते.

प्रमुख उपस्थितीमध्ये गावचे सरपंच भगवान रिंढे, जिल्हा परिषद शाळेच्या शिक्षिका सौ. छाया बावणे, जिल्हा परिषद शाळेचे शिक्षक किशोर पवार, वनस्पतिशास्त्र विभागाचे सहाय्यक प्राध्यापक डॉ. काळपांडे, उ?द्यानविद्या विभागाचे सहाय्यक प्राध्यापक डॉ. विशाल तायडे, कृषी अभियांत्रिकी विभागाच्या सहाय्यक प्राध्यापिका डॉ. स्नेहल डोंगरदिवे मॅडम तसेच विस्तार शिक्षण विभागाच्या सहाय्यक प्राध्यापिका डॉ. अश्विनी डांगोरे यांची प्रमुख उपस्थिती लाभली. यावेळी मान्यवरांनी विद्यार्थी, ग्रामस्थ आणि शालेय विद्यार्थ्यांना वृक्षांचे पर्यावरणीय महत्त्व, जैवविविधतेचे संवर्धन आणि प्रत्येकाने दरवर्षी किमान एक तरी वृक्ष लावून त्याचे संगोपन करण्याचे आवाहन केले. वृक्षारोपण ही केवळ औपचारिकता नसून भावी पिढीसाठी हिरवेगार आणि प्रदूषणमुक्त पर्यावरण निर्माण करण्याची सामूहिक जबाबदारी असल्याचे त्यांनी आपल्या मनोगतातून सांगितले. यानंतर मान्यवरांच्या हस्ते विविध प्रकारच्या वृक्षांची लागवड करण्यात आली." विद्यार्थिनींनी वृक्षलागवडीचे महत्त्व, लागवडीनंतरची निगा व संवर्धन याबाबत मार्गदर्शन केले. कार्यक्रमात शाळेतील विद्यार्थी, शिक्षक, ग्रामस्थ आणि विद्यार्थिनी यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवून पर्यावरण संरक्षणाची सामूहिक शपथ घेतली.कार्यक्रमाचे नियोजन व आयोजन वि?द्यार्थिनी, भाऊसाहेब फुंडकर शासकीय कृषी महावि?द्यालय, बुलडाणा यांनी केले. कार्यक्रमामुळे ग्रामस्थांमध्ये पर्यावरण संरक्षणाविषयी जनजागृती होऊन वृक्षसंवर्धनाचा प्रभावी संदेश देण्यात आला.

# तालुका आत्मा समिती अध्यक्षपदी शामल कोकाटे यांची निवड

प्रतिनिधी ३ जुलै



**मुर्तीजापुर :** तालुका आत्मा समिती अध्यक्षपदी शामल कोकाटे यांची निवड करण्यात आली आहे. जिल्हाधिकारी अकोला तसेच प्रकल्प संचालक यांच्या मंजुरीने २२ सदस्यांची समिती जाहीर करण्यात आलेली आहे.

खासदार अनुप धोत्रे, आमदार हरीश पिंपळे व आमदार रणधीर सावरकर यांच्या मार्गदर्शनात कृषी विभाग अंतर्गत समिती गठीत झाली. अध्यक्षपदी शामल भूषण कोकाटे, सदस्य म्हणून कांताबाई विरूळकर शुभांगी खंडारे नंदाबाई जाधव, गिताबाई हजारी राधिका काळे आरती पोळकट , राजेंद्र इंगोले, रामा भारती , मयूर कोकाटे सुधीर बोळे गणेश ठाकरे आशिष कोकाटे , आशिष डाबेराव, रोशन मुरळ, अरुण घाईट, गजानन ढोरे, गोपाल निंगोट, राजकुमार उबळे देवान राठोड राहुल गोलाम, आणि दत्ता राज राऊत यांची निवड करण्यात आली आहे.

# रेल्वेस्टेशन रोड मार्गाला वसंतराव नाईक यांचे नाव द्या



प्रतिनिधी ३ जुलै

**अकोला :** महाराष्ट्राचे सर्वाधिक काळ मुख्यमंत्री राहिलेले स्व.वसंतरावजी नाईक यांनी महाराष्ट्राला सुजलाम सुफलाम करून समृद्ध महाराष्ट्र घडविण्याचे कार्य केले. त्यांनी हरितक्रांती, औद्योगीकरणास चालना, कृषी विद्यापीठाची निर्मिती, रोजगार हमी योजना, पंचायत राज यासारखे अनेक लोककल्याणकारी कार्ये केलेली आहेत. त्यांच्या कार्याच्या स्मरणार्थ रेल्वे स्टेशन मार्गावर जिल्हा क्रीडा संकुलच्या परिसरात भव्य पूर्णाकृती पुतळा देखील उभारला आहे. तद्वतच - वसंतराव नाईक साहेब यांच्या कार्याच्या आठवणींना सदैव उजाळा मिळत राहावा याकरिता रेल्वे स्टेशन रोड मार्गाला वसंतराव नाईक मार्ग' असे नांव देण्यात यावे यासाठी महापालिका स्थायी समिती सभापती विजय अग्रवाल यांना समाजाच्या वतीने निवेदन दिले.

# पातूरच्या किड्स पॅराडाईजमध्ये अवतरली 'ज्ञानाची पालखी'

प्रतिनिधी ३ जुलै

**पातूर :** येथील किड्स पॅराडाईज पब्लिक स्कूलमध्ये शैक्षणिक सत्र २०२६-२७ चा प्रारंभ अत्यंत उत्साहपूर्ण आणि प्रेरणादायी वातावरणात करण्यात आला.

शाळेत विद्यार्थ्यांनी शालेय पाठ्यपुस्तके, भारतीय संविधान, ग्रामगीता, तुकाराम गाथा यांसारख्या ज्ञानपर ग्रंथांचे पूजन करून त्यांची पालखी काढली. उत्साहपूर्ण वातावरणात काढण्यात आलेल्या 'ज्ञान दिंडी'ने परिसर संस्कारमय झाला. यावेळी या ज्ञानाच्या पालखीचे पूजन शाळेचे संस्थापक अध्यक्ष गोपाल गाडगे व कार्यकारी संचालिका सौ. ज्योत्स्ना गाडगे यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी शाळेच्या प्रवेशद्वारावर संत आणि थोर महापुरुषांच्या प्रतिमा हातात घेऊन विद्यार्थी उभे होते. पालखीसोहळ्यात सहभागी झालेल्या प्रत्येक विद्यार्थ्याने या महापुरुषांना वंदन करून त्यांच्या विचारांचा आदर्श जीवनात अंगीकारण्याचा तसेच ज्ञानार्जनासाठी सातत्याने प्रयत्न करण्याचा संकल्प केला. त्यामुळे शाळेचा प्रवेशोत्सव हा केवळ स्वागताचा कार्यक्रम न राहता विद्यार्थ्यांमध्ये मूल्यशिक्षणाची बीजे रुजविणारा प्रेरणादायी उपक्रम ठरला. प्री-प्रायमरीच्या विद्यार्थ्यांचे फुलांचा वर्षाव करून जंगी स्वागत करण्यात आले. हा अभिनव प्रवेशोत्सव शाळेचे संस्थापक अध्यक्ष गोपाल गाडगे आणि कार्यकारी संचालिका सौ. ज्योत्स्ना गाडगे यांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न झाला. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी मुख्याध्यापक चंद्रमणी धाडसे, नीतू ढोणे, नरेंद्र बोरकर, प्रियंका चव्हाण, बजरंग भुजबटराव, स्वप्निल पाटील, अविनाश पाटील, शुभांगी बोरकर, प्रतीक्षा भारसाकळे,, स्मितल उगले, वैशाली इंगळे, अक्षय तायडे, सदानंद कातखेडे, हरिष सौंदळे, राजश्री खंडारे, तेजस्विनी गवई, समीक्षा डोंगे, यांच्यासह कल्पना वानेरे, रोशनी नकाशे तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.



# आता नगरपरिषद शाळेमध्ये विद्यार्थ्यांना मिळणार रोबोटिक्स, अबॅकस आणि इंग्लिश स्पिकिंगचे धडे

प्रतिनिधी ३ जुलै

**तेल्हारा :** नगर परिषद प्राथमिक मराठी शाळांमधील विद्यार्थ्यांची शैक्षणिक गुणवत्ता वाढवण्यासाठी आणि त्यांना आधुनिक काळातील आव्हानांसाठी सक्षम बनवण्यासाठी तेलहारा नगर परिषदेने एक अत्यंत कौतुकास्पद पाऊल उचलले आहे. विद्यार्थ्यांना रोबोटिक, अबॅकस, इंग्लिश स्पिकिंग शिक्षण मिळणार आहे. नगर परिषद प्राथमिक शाळांमध्ये आता विद्यार्थ्यांना अत्याधुनिक आणि तांत्रिक कोर्सेस पूर्णपणे मोफत शिकवले जाणार आहेत. या संदर्भातील प्रस्तावाला सर्वसाधारण सभेत मंजुरी देण्यात आली आहे. याबाबत सविस्तर वृत्त असे की, 'कौंतेय एज्युकेशन प्रा. लि. अकोट' या नामांकित संस्थेमार्फत तेलहारा शहरातील नगर परिषद प्राथमिक मराठी शाळांमधील विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी मोफत शैक्षणिक सेवा देण्याबाबतचा प्रस्ताव कार्यालयास प्राप्त झाला होता. या नाविन्यपूर्ण उपक्रमाचे महत्त्व लक्षात घेऊन, नगर परिषद प्रशासनाने सदर विषय अंतर्गत हा प्रस्ताव मंजुरीसाठी सभेसमोर ठेवला होता. या उपक्रमामुळे गरीब व सामान्य कुटुंबातील विद्यार्थ्यांना खाजगी शाळांच्या धर्तीवर उच्च दर्जाचे शिक्षण मिळणार असल्याने सर्वसाधारण सभेने याला मंजुरी दिली आहे. हा ऐतिहासिक व महत्त्वपूर्ण निर्णय घेतल्याबद्दल सन्माननीय सदस्यांनी नगराध्यक्ष, उपाध्यक्ष, मुख्याधिकारी, गटनेते , शिक्षण समिती सभापती आणि सर्व नगर परिषद प्रशासनाचे मनापासून आभार मानले आहेत. या सकारात्मक भूमिकेमुळे नगर परिषद शाळांचा कायापालट होईल, असा विश्वास लोकप्रतिनिधींनी व्यक्त केला आहे.

# ग्रामीण भागातील शिक्षणाचा दर्जा पुण्यासारखा झाला पाहिजे - नायब तहसीलदार रवींद्र राऊत

प्रतिनिधी ३ जुलै



**मुर्तीजापुर :** लाखपुरी येथील जि.प. वरिष्ठ प्राथमिक केंद्र शाळेत सोमवारी दि. ३० ला शाळा प्रवेशोत्सव व शाळा पूर्वतयारी मेळावा क्र. २ मोठ्या उत्साहात पार पडला. कार्यक्रमाला निरीक्षक म्हणून उपस्थित नायब तहसीलदार रवींद्र राऊत यांनी शाळेचे कामकाज पाहून समाधान व्यक्त केले व ञ'ग्रामीण भागातील शिक्षणाचा दर्जा पुण्यासारख्या शहरांप्रमाणे उंचावला पाहिजे'असे प्रतिपादन केले.

इयत्ता पहिलीत दाखलपात्र विद्यार्थ्यांसह गावातून दिंडी काढण्यात आली, पहिलीच्या विद्यार्थी व पालकांचे फुल देऊन, तर चिमुकल्यांचे पायांचे ठसे घेऊन स्वागत करण्यात आले. मेळाव्याचे उद्घाटन नायब तहसीलदार रवींद्र राऊत यांच्या हस्ते झाले.

मंडळ अधिकारी राजेंद्र जाधव, तलाठी वीरेंद्र वानखडे, ग्राम विकास अधिकारी गोवर्धन जाधव, ऑपरेटर प्रशिक चक्रे, केंद्रीय शिक्षक मदन कैथवास, सचिन बनसोड आदी उपस्थित होते.

यावेळी शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्षा नलिनीताई चौहान, केंद्रप्रमुख प्रमोद उपाध्ये, वर्षा बरडे, अलका गावंडे, समाधान उमप, सचिन जोशी, राहुल तिडके, जानवी देशमुख, संगीता विल्हेकर यांच्यासह शिक्षक, पालक व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. सूत्रसंचालन राहुल तिडके यांनी तर आभार सचिन जोशी यांनी मानले.

# कवठा बु. ते आसेगाव रस्त्यावरील पाण्याच्या खड्डयामधून विद्यार्थ्यांचा प्रवास

प्रतिनिधी ३ जुलै



**अकोट :** अकोट तालुक्यातील कवठा बु. ते आसेगाव (बाजार) मुख्य रोडवर ठिकठिकाणी मोठ मोठे खड्डे पडल्याने वाहतूक व पादचाऱ्यांना जीव धोक्यात टाकून रोडवरून तारेवरची कसरत करावी लागत आहे. मेळघाट मधील चिखलदरा बायपास म्हणून ओळखल्या जाणाऱ्या कवठा बु.तेआसेगाव (बाजार) या रोडवर गेल्या तीन महिन्यापासून रस्ता रुंदीकरणाचे काम अर्धवट अवस्थेत पडले आहे बऱ्याच ठिकाणी मोठमोठाले खड्डे पडले असून पहिल्याच पावसात खड्डयांमध्ये सर्वत्र मोठ्या प्रमाणात पाणी साचल्याने वाहतुकीला मोठ्या प्रमाणात अडथळा निर्माण होत आहे कवठा बु. येथील पत्रकार राजेश साविकर यांच्या घरासमोरच चिखल व मोठे पाण्याचे डबर झाले त्यामधील पाणी नाली मध्ये स्वतः त्यांनी काढून द्यायचा कितीतरी वेळा प्रयत्न केला आहे मोठ्या प्रमाणात खड्डे पडले असून त्यामध्ये पाणी साचल्याने परिसरात दुर्गंधी वाढती आहे अपघात ला जीव धोक्यात टाकण्याची वेळ निर्माण झाली आहे. कवठा बु. तेआसेगाव (बाजार) हा रोड अत्यंत रहदारीचा रोड असून सावरा, दर्यापुर, वडाळी (देशमुख), तसेच पणज कडे जाण्यासाठी मुख्यतः याच रोडचा सर्रास वापर करण्यात येतो रोडवरून मोठ्या प्रमाणात वाहनांची येजा असते. मागील वर्षीपासून सदर रोड ची परिस्थिती जैसे थेअसून संबंधित विभागाकडे लेखी तसेच तोंडी स्वरूपाच्या वारंवार तक्रारी करून सुद्धा निगरगट्ट अधिकाऱ्यांनी या समस्येकडे ढुंकूनही बघितले नाही.

# उज्वल पब्लिक स्कूलमध्ये 'शाळा प्रवेश उत्सव' उत्साहात

प्रतिनिधी ३ जुलै



**अकोट :** बोरगाव मंजू स्थानिक उज्वल पब्लिक स्कूल येथे नवीन शैक्षणिक वर्षाच्या प्रारंभी 'शाळा प्रवेश उत्सव' मोठ्या उत्साहात आणि आनंदी वातावरणात साजरा करण्यात आला. सुटीनंतर पहिल्यांदाच शाळेत येणाऱ्या विद्यार्थ्यांचे औक्षण, गुलाबपुष्प देऊन आणि टाळ्यांच्या गजरात स्वागत करण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेच्या मुख्याध्यापिका उज्वला सोनवणे तर प्रमुख अतिथी म्हणून नायब तहसीलदार नरेंद्र सोनवणे उपस्थित होते. तसेच प्रशासकीय अधिकारी निता राजेंद्र बोबडे यांची प्रमुख उपस्थिती लाभली. मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. शाळेच्या प्रवेशद्वाराची आकर्षक सजावट करण्यात आली होती. निळ्या-पांढ्या फुग्यांच्या कमानीतून विद्यार्थ्यांचे स्वागत करण्यात आले. पारंपरिक वेशभूषेतील शिक्षिकांनी विद्यार्थ्यांना कुंकू टिळा लावून, औक्षण करून आणि गुलाबपुष्प देत स्वागत केले.

त्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. यावेळी विद्यार्थ्यांना नवीन पाठ्यपुस्तके व शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. मार्गदर्शन करताना नायब तहसीलदार नरेंद्र सोनवणे यांनी शिक्षणाचे महत्त्व अधोरेखित करत विद्यार्थ्यांनी नियमित अभ्यास करून उज्ज्वल भवितव्य घडवावे, असे आवाहन केले. शाळेच्या पहिल्याच दिवशी विद्यार्थ्यांच्या मनात भीतीऐवजी आनंद आणि आत्मविश्वास निर्माण करण्याचा उद्देश या उपक्रमामागे असल्याचे त्यांनी सांगितले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी जया हगवणे, राऊत मॅडम, स्वाती जैन, दिपाली देशमुख, दुर्गा असोलमोल, अश्विनी माहुलकर, मीना वानखडे, रूपाली कडू, मोहिनी इंगळे, शारदा देशमुख, प्रीती वाघमारे, प्रशांत होनाळे, रूपाली इंगळे, पूजा भराटे आणि प्रतीक वानखडे यांनी परिश्रम घेतले.

## निधन वार्ता

### सौ. विजया पाटील



**अकोला :** शहरातील व्हीएचबी कॉलनी येथील रहिवासी सौ. विजया अरविंद पाटील यांचे १ जुलै २० रोजी निधन झाले. सिंधी कॅम्प स्मशानभुमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पती, मुलगा, मुलगी व आप्तपरिवार आहे.

### अमृत तांबडे



**मुर्तीजापुर :** सोनोरी येथील शेतकरी अमृत तांबडे ७८ यांचे निधन झाले. त्यांचे मागे मोठा परिवार आहे. सोनोरी गावात अंतिम संस्कार करण्यात आले.

समर्थ शिक्षण प्रसारक मंडळ व्दारा संचालित एफ 5226
मॉं. गायत्री प्राथमिक शाळा व
स्व. प्रकाश देशमुख माध्यमिक विद्यालय
गायत्री नगर. अकोला
आम्ही गुणवत्ता पाहून प्रवेश देत नाही तर, प्रवेश घेणाऱ्या प्रत्येकामध्ये गुणवत्ता निर्माण करतो!
इयत्ता 1 ली ते 10 वी साठी प्रवेश देणे सुरु आहे.
> इयत्ता 1 ली ते 8 वी च्या विद्यार्थ्यांना मोफत गणवेश
> इयत्ता 1 ली ते 10 वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांना मोफत बससेवा उपलब्ध
> शालेय पोषण आहार
वैशिष्ये :
> अनुभवी शिक्षकवृंद
> सुसज्ज पायाभूत ईमारत
> दर्जेदार अभ्यासक्रमासोबत नाविण्यपूर्ण उपक्रम
> सर्व पुस्तकांनी युक्त वाचनालय
> आनंददायी शिक्षण पध्दती
> CCTV ची सुविधा
> कला, संस्कृती, क्रिडा विद्यार्थ्यांच्या सर्वांगीन विकासावर भर
> सुसज्ज प्रयोगशाळा

पत्ता : मॉ गायत्री प्राथमिक शाळा व स्व. प्रकाश देशमुख विद्यालय
मो. 9921186715, 9511254959, 9421895790,9960437366

सिटी न्यूज सुपरफास्ट यवतमाळ
शुक्रवार, दि. ३ जुलै २०२६ https://epaper.citynewssuperfast.com


# नेत्यांचे मनोमिलन : कार्यकर्ते अन् नगरसेवकांमध्ये अजूनही दुरावा ?

## दिग्रसच्या राजकारणात नवे समीकरण : स्थानिक पातळीवरील मतभेद मिटवण्याचे आव्हान

प्रतिनिधी ३ जुलै

**संदीप रत्नपारखी**





**दिग्रस :** राज्यातील राजकीय समीकरणांमध्ये बदल झाल्यानंतर मंत्री संजय राठोड आणि खासदार संजय देशमुख यांच्यातील मनोमिलन आणि समन्वयाची चर्चा जोरात आहे. मात्र, दिग्रस शहरात स्थानिक पातळीवर नगरसेवक आणि कार्यकर्त्यांमध्ये अद्याप दुरावा कायम असल्याचे चित्र दिसत आहे. वरिष्ठ नेत्यांच्या भेटीगाठी झाल्या तरी तळागाळातील कार्यकर्त्यांपर्यंत एकजुटीचे वातावरण निर्माण होण्यास वेळ लागेल, अशी राजकीय निरीक्षकांची मतं आहेत.

नुकत्याच पार पडलेल्या दिग्रस नगर परिषदेच्या सर्वसाधारण सभेत विविध मुद्द्यांवर झालेला गदारोळ आणि काही भागांमध्ये दोन्ही गटांच्या कार्यकर्त्यांमध्ये झालेल्या शाब्दिक वादविवादांच्या घटना या पार्श्वभूमीवर अधिक चर्चिले जात आहेत. अनेक वर्षे वेगवेगळ्या गटांमध्ये काम केलेल्या कार्यकर्त्यांना एकत्र आणणे सोपे नसल्याचे राजकीय जाणकार सांगतात.

गेल्या अनेक निवडणुकांमध्ये दोन्ही गटांतील कार्यकर्त्यांनी एकमेकांविरुद्ध आक्रमक भूमिका घेतली होती. प्रचार, संघटनात्मक स्पर्धा आणि स्थानिक वर्चस्वासाठी झालेल्या संघर्षामुळे निर्माण झालेला दुरावा एका दिवसात मिटणे कठीण आहे. यामुळे नेत्यांचे मनोमिलन तळागाळापर्यंत कसे पोहोचेल, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

आता सर्वांचे लक्ष दोन्ही नेत्यांकडे मंत्री संजय राठोड आणि खासदार संजय देशमुख यांच्या नेतृत्वाखाली नगरसेवक, पदाधिकारी आणि सामान्य कार्यकर्त्यांमध्ये समन्वय साधण्याचे मोठे आव्हान आहे. दोन्ही नेते यात कितपत यशस्वी ठरतात, यावर दिग्रसच्या राजकारणाचे भवितव्य अवलंबून आहे.

राजकीय विश्लेषकांच्या मते, वरिष्ठ स्तरावरील एकीचे खरे यश तेव्हाच दिसेल, जेव्हा ते स्थानिक पातळीवरील नगरसेवक आणि कार्यकर्त्यांपर्यंत पोहोचेल. अन्यथा 'वरिष्ठांमध्ये एकी आणि तळागाळात मतभेद' अशी स्थिती कायम राहू शकते.

आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर हे आव्हान अधिक महत्त्वाचे मानले जात आहे. सध्या दिग्रसच्या राजकीय वर्तुळात "नेत्यांचे मनोमिलन झाले, पण कार्यकर्त्यांचे मनोमिलन कधी होणार?" असा एकच प्रश्न चर्चिला जात आहे.

# डॉक्टर्स डे निमित्त डॉक्टरांचा सन्मान

प्रतिनिधी ३ जुलै

**महागाव :** माउंट लिट्रा झी स्कूल, महागाव येथे राष्ट्रीय डॉक्टर्स डे उत्साहपूर्ण वातावरणात आणि कृतज्ञताभावाने साजरा करण्यात आला. यानिमित्त परिसरातील मान्यवर डॉक्टरांचा शाल, पुष्पगुच्छ आणि स्मृतिचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. प्राचार्या मंजू जोशी यांच्या पुढाकारातून आयोजित कार्यक्रमाला डॉ. वाघमारे, डॉ. चौधरी आणि डॉ. बेलगमवार यांची प्रमुख उपस्थिती लाभली. यावेळी डॉक्टरांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधत आरोग्य, स्वच्छता, संतुलित आहार, नियमित व्यायाम आणि निरोगी जीवनशैलीचे महत्त्व पटवून दिले. तसेच मोठी स्वप्ने पाहून समाजसेवेची भावना जपण्याचा संदेशही त्यांनी विद्यार्थ्यांना दिला.

कार्यक्रमाला शाळेचे चेअरमन विशाल पांडे आणि प्रबंधक शहाबाज सुरैया उपस्थित होते. त्यांनी डॉक्टरांच्या समाजाप्रती असलेल्या योगदानाचा गौरव करत त्यांच्याप्रती कृतज्ञता व्यक्त केली. यावेळी डॉक्टर हे समाजाचे जीवनदाते असून, रुग्णसेवेतून ते निःस्वार्थ भावनेने कार्य करतात, अशी भावना व्यक्त करण्यात आली. निरोगी समाजाच्या उभारणीत त्यांच्या योगदानाचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी शाळेतील शिक्षक व कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले. या उपक्रमाचे उपस्थितांकडून कौतुक करण्यात आले.

# सावळी सदोबा आठवडी बाजार चिखलात

## सुविधांअभावी ४० गावांतील नागरिक त्रस्त



प्रतिनिधी ३ जुलै



**आर्णी :** आर्णी तालुक्यातील सावळी सदोबा येथील आठवडी बाजार पावसाळ्यात चिखलाच्या विळख्यात सापडला असून, मूलभूत सुविधांच्या अभावामुळे परिसरातील सुमारे ४० गावांतील नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे.

याप्रकरणी बहुजन मुक्ती पार्टीने ग्रामपंचायतीच्या कारभारावर नाराजी व्यक्त करत तातडीने उपाययोजना करण्याची मागणी केली आहे.

सावळी सदोबा येथे दर गुरुवारी भरणारा आठवडी बाजार हा परिसरातील प्रमुख बाजारपेठ मानला जातो. हजारो शेतकरी, व्यापारी, महिला व नागरिक खरेदी-विक्रीसाठी येथे येत असतात. ग्रामपंचायतीने बाजाराचे टेंडर काढून महसूल वसूल केला असला, तरी बाजार परिसरात आवश्यक सुविधांचा अभाव असल्याची तक्रार नागरिकांनी केली आहे. पावसाळा सुरू झाल्यानंतर बाजार परिसरात मोठ्या प्रमाणावर चिखल आणि पाणी साचत असून, अल्प पावसातही संपूर्ण परिसर दलदलीचे स्वरूप धारण करीत आहे. त्यामुळे महिला, ज्येष्ठ नागरिक, लहान मुले आणि शेतकऱ्यांना मोठी कसरत करावी लागत आहे. अनेक नागरिक घसरून पडत असल्याने अपघाताचा धोका वाढला आहे.

बहुजन मुक्ती पार्टीचे आर्णी-केळापूर विधानसभा प्रभारी भुवन मुनेश्वर यांनी बाजार परिसरात काँक्रीटीकरण करणे, मुरूम व खडी टाकणे, पाण्याचा निचरा करण्याची व्यवस्था उभारणे, सुरक्षित पादचारी मार्ग तयार करणे आणि स्वच्छतेच्या कायमस्वरूपी उपाययोजना करण्याची मागणी केली आहे.

तातडीने उपाययोजना न झाल्यास ग्रामपंचायत कार्यालयासमोर लोकशाही मार्गाने आंदोलन करण्यात येईल, असा इशाराही त्यांनी दिला. बाजार परिसरात कोणतीही दुर्घटना घडल्यास त्यास संबंधित प्रशासन जबाबदार राहील, असे त्यांनी म्हटले आहे.

दरम्यान, सावळी सदोबा येथील आठवडी बाजार चिखलमुक्त व सुरक्षित करण्याची मागणी परिसरातील नागरिकांकडून जोर धरत आहे.

# कुख्यात आरोपीला अटक; पांढरकवडा पोलिसांची कारवाई

प्रतिनिधी ३ जुलै




**यवतमाळ :** खून, मारामारी, दरोडा तसेच बेकायदेशीर शस्त्र बाळगण्याच्या गंभीर गुन्ह्यांमध्ये आरोपी असलेला व तडीपार आदेशाचे उल्लंघन करून फरार झालेला कुख्यात आरोपी करण संजय शिंदे (वय ३२, रा. ताडउमरी, ता. केळापूर) याला पांढरकवडा पोलिसांच्या डीबी पथकाने नागपूर येथून ताब्यात घेतले आहे.

याप्रकरणी आकीब बेग अफाज बेग मिर्झा (वय २८, रा. मोमीनाबाद कॉलनी, पांढरकवडा) यांच्या फिर्यादीवरून पांढरकवडा पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक ७८७/२०२६ नोंदविण्यात आला आहे. या प्रकरणात करण शिंदेसह सात जणांविरुद्ध भारतीय न्याय संहितेतील विविध कलमे, फौजदारी कायदा सुधारणा अधिनियम तसेच शस्त्र अधिनियमांतर्गत गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

घटनेनंतर आरोपी क्रमांक दोन ते सात यांना तत्काळ अटक करण्यात आली होती. मात्र, मुख्य आरोपी करण शिंदे हा फरार होता. त्याच्या शोधासाठी पांढरकवडा पोलिसांच्या डीबी पथकाने गुप्त माहिती आणि तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे शोधमोहीम राबविली. अखेर नागपूर शहरातून त्याला ताब्यात घेऊन पुढील कारवाईसाठी पांढरकवडा येथे आणण्यात आले.

ही कारवाई पोलीस अधीक्षक कुमार चिंता, अपर पोलीस अधीक्षक अशोक थोरात तसेच सहाय्यक पोलीस अधीक्षक तथा उपविभागीय पोलीस अधिकारी रॉबीन बन्सल यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. पोलीस निरीक्षक एल. डी. तावरे यांच्या नेतृत्वाखाली पोलीस उपनिरीक्षक नितीन सुशीर, पोहेकॉ. प्रमोद जुनुनकर, विलास जाधव, रजनीकांत पाटील तसेच नापोकॉ. सुनील राठोड, सचिन काकडे आणि पोलीस कॉन्स्टेबल राजू मुत्तलवार यांनी या मोहिमेत सहभाग घेतला.

# 'हॅम्प'ने रस्त्याची केली ऐशी-तैशी

## उमरखेड-हरदडा-विडूळ रस्ता चिखलमय

प्रतिनिधी ३ जुलै



**उमरखेड :** पुसद-हरदडा राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण (हॅम्प) अंतर्गत सुरू असलेल्या रस्त्याच्या कामात ठेकेदाराच्या बेपर्वाई व प्रशासकीय उदासीनतेमुळे उमरखेड-हरदडा-विडूळ या अंतर्गत रस्त्याची अवस्था अत्यंत दयनीय झाली आहे. खोदकाम करून माती टाकून ठेवलेल्या रस्त्यावर पावसाळ्यात चिखल झाल्याने दुचाकीस्वार सतत घसरून पडत आहेत. किरकोळ जखमी होणाऱ्यांची संख्या वाढत असल्याने परिसरातील नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे.

रस्त्याचे काम अत्यंत संथ गतीने आणि बेफिकीर पद्धतीने सुरू असल्याने पावसाळ्यात प्रवास करणे वाहनधारकांसाठी जीवघेणे ठरले आहे. स्थानिकांनी यापूर्वी लक्षवेधी आंदोलने केली, ठेकेदाराकडे वारंवार तक्रारी केल्या, तरी कामात कोणतीही लक्षणीय प्रगती झालेली नाही. उलट, दिरंगाईमुळे रस्त्यावर साचलेल्या मातीचा पावसाच्या पाण्याने चिखल झाला असून, दुचाकी रस्त्यावर झोके घेत घसरताना दिसत आहेत.

"रस्त्याची ही अवस्था पाहून संताप येतो. रोज अनेक जण जखमी होत आहेत. शेतकरी, विद्यार्थी आणि दैनंदिन प्रवाशांना सर्वाधिक त्रास सहन करावा लागतो. हॅम्प कंपनी आणि ठेकेदार यांच्या गंमतीजमतीमुळे आमचा जीव धोक्यात आला आहे," अशी तीव्र प्रतिक्रिया एका स्थानिक नागरिकाने दिली.

लोकप्रतिनिधी आणि प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे हा रस्ता पावसाळ्यात दुर्दैवी ठरला आहे. नागरिकांच्या सुरक्षिततेकडे पूर्णपणे दुर्लक्ष केले जात असल्याचे चित्र आहे. हॅम्प कंपनीने तातडीने रस्त्याचे काम वेगाने पूर्ण करून खड्डे बुजवावेत आणि चिखल साफ करावा, अशी मागणी परिसरातील नागरिकांनी केली आहे.

सद्यस्थितीत रस्त्यावरून जाणे धोक्याचे ठरले असल्याने प्रशासनाने त्वरित लक्ष घालून नागरिकांच्या जीवित हानीला प्रतिबंध करावा, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# मोफत हयात प्रमाणपत्र उपक्रमानंतर वाद

## निष्पक्ष चौकशी करा; 'आम्ही दिग्रसकर' संघटनेची मागणी

प्रतिनिधी ३ जुलै

■ 'आम्ही दिग्रसकर' संघटनेने सामाजिक बांधिलकी जपत गरीब आणि गरजू नागरिकांसाठी मोफत सेवा देण्याचा प्रयत्न केला असताना, त्याला राजकीय व आर्थिक हितसंबंधातून विरोध होत असल्याचे दिसून येत आहे. या प्रकरणी प्रशासन किती तत्परतेने कारवाई करते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

**दिग्रस :** गरीब, गरजू आणि दिव्यांग नागरिकांसाठी राबवण्यात आलेल्या मोफत हयात प्रमाणपत्र उपक्रमानंतर दिग्रस शहरात वाद निर्माण झाला आहे. 'आम्ही दिग्रसकर' संघटनेने या प्रकरणाची निष्पक्ष आणि सखोल चौकशी करण्याची मागणी महाराष्ट्र शासन व जिल्हा प्रशासनाकडे केली आहे.

संघटनेने दिलेल्या निवेदनानुसार, समाजसेवेच्या उद्देशाने सुरू केलेल्या या मोफत उपक्रमांतर्गत सुमारे ६०० गरीब, गरजू, निराधार व दिव्यांग नागरिकांना कोणतेही शुल्क न घेता हयात प्रमाणपत्र उपलब्ध करून देण्यात आले. या उपक्रमामुळे लाभार्थ्यांचा वेळ, पैसा आणि शासकीय कार्यालयांच्या चकरा वाचल्याचा दावा संघटनेने केला आहे.

मात्र, या मोफत सेवेमुळे काही व्यक्तींचे आर्थिक हितसंबंध बाधित झाल्याने संघटनेविरोधात बदनामीचे षड्यंत्र रचले जात असल्याचा गंभीर आरोप 'आम्ही दिग्रसकर' संघटनेने केला आहे. संघटनेच्या म्हणण्यानुसार, एका अर्जदाराच्या भावाकडून तहसील कार्यालयाच्या मुख्य प्रवेशद्वाराजवळ अतिक्रमण करून सेतू सेवा केंद्र चालविले जात आहे. मोफत उपक्रमामुळे त्यांचे आर्थिक नुकसान होत असल्याने ते संघटनेविरोधात रचलेल्या षड्यंत्राचा भाग असल्याचे सांगितले जात आहे.

संघटनेने आरोप केला आहे की, काही व्यक्ती माहितीचा अधिकार (आरटीआय) कायद्याचा गैरवापर करून अधिकारी वर्गावर दबाव टाकत आहेत. तसेच संघटनेकडे खंडणी मागण्याचे प्रयत्न आणि शहरात जातीय तेढ निर्माण करून संघटनेची प्रतिमा मलिन करण्याचा डाव सुरू असल्याचा संशय व्यक्त केला आहे.

या सर्व प्रकाराची निष्पक्ष चौकशी करून सत्य जनतेसमोर आणावे, अशी मागणी संघटनेने केली आहे. चौकशीत आरटीआय कायद्याचा गैरवापर, दबाव, खंडणी किंवा जातीय तेढ निर्माण करण्याचे प्रयत्न आढळल्यास संबंधितांवर कठोर कायदेशीर कारवाई करण्यात यावी, असेही संघटनेने स्पष्ट केले आहे.

# शिवसैनिकावर हल्ला करणारा मुख्य आरोपी जेरबंद

प्रतिनिधी ३ जुलै

**उमरखेड :** शहरातील शिवसेना कार्यकर्ते रमेश गुलाब चव्हाण यांच्यावर झालेल्या जीवघेण्या हल्लाप्रकरणातील मुख्य आरोपीला स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने अखेर अटक केली. परवेज ऊर्फ लाला खान सलीम खान रा. उमरखेड असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. १६ जून रोजी सायंकाळी नगरपरिषद मुख्याधिकारी यांच्या शासकीय निवासस्थानाजवळ रमेश चव्हाण यांची मोटारसायकल अडवून त्यांच्यावर चाकू व लोखंडी रॉडने जीवघेणा हल्ला करण्यात आला होता. या घटनेनंतर शहरात खळबळ उडाली होती. दुसऱ्या दिवशी उमरखेड पोलिसांत अज्ञात आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला होता.

तपासादरम्यान या गुन्ह्यात पाच आरोपींचा सहभाग निष्पन्न झाला असून, त्यापैकी दोघांना यापूर्वीच अटक करण्यात आली होती. मात्र, मुख्य आरोपी परवेज ऊर्फ लाला खान हा गुन्हा घडल्यापासून फरार होता.

बुधवारी (ता. १) स्थानिक गुन्हे शाखेला आरोपी शेंबाळपिंपरी परिसरात असल्याची गुप्त माहिती मिळाली. त्यानुसार पोलिसांनी शेंबाळपिंपरी-कळमनुरी मार्गावर सापळा रचून त्याला शिताफीने ताब्यात घेतले. या अटकेमुळे हल्लाप्रकरणाच्या तपासाला महत्त्वाचे यश मिळाले आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक कुमार चिंता, अपर पोलीस अधीक्षक अशोक थोरात व स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सतीश चवरे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. सहाय्यक पोलीस निरीक्षक धीरज बांडे, पोलीस उपनिरीक्षक अमोल राठोड, मुन्ना आडे, संतोष भोरगे, तेजाब रणखांब, सुभाष जाधव, कुणाल मुंडोकार, रमेश राठोड, सुनील पंडागळे, रविंद्र शिरामे व राजेश जाधव यांनी या कारवाईत सहभाग घेतला.

# कै.डॉ.पंजाबराव देशमुख यांची जयंती

## गुणवंतराव देशमुख शिक्षण संकुलात अभिवादन; शैक्षणिक कार्याचा जागर

प्रतिनिधी ३ जुलै






**पुसद :** गुणवंतराव उपाख्य अण्णासाहेब देशमुख चॅरिटेबल ट्रस्ट, पुसदचे संस्थापक तथा माजी आमदार कै. डॉ. पंजाबरावजी देशमुख यांची ८३ वी जयंती गुणवंतराव देशमुख शिक्षण संकुलात उत्साहात साजरी करण्यात आली.

यावेळी डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या पुतळ्याचे पूजन व माल्यार्पण करून अभिवादन करण्यात आले. संस्थेचे सचिव प्रा. विजयराव देशमुख, सहसचिव राजाभाऊ देशमुख, संचालक हर्षल देशमुख, विशाल देशमुख आणि शाळा समिती सदस्य अजय खैरे यांच्या हस्ते हा कार्यक्रम पार पडला.

त्यानंतर आयोजित सभेत अध्यक्षस्थानावरून बोलताना प्रा. विजयराव देशमुख यांनी डॉ. पंजाबराव देशमुख यांच्यासोबतच्या सहवासापासून आमदार होण्यापर्यंतच्या त्यांच्या प्रवासाला उजाळा दिला. त्यांनी डॉ. देशमुख यांच्या राजकीय, सामाजिक आणि शैक्षणिक कार्याची माहिती देत विद्यार्थ्यांनी व शिक्षकांनी गुणवंतराव शिक्षण संकुलाचे नाव अधिक उज्ज्वल करण्यासाठी परिश्रम घेण्याचे आवाहन केले.

प्रमुख अतिथी अजय खैरे यांनीही डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या कार्यकर्तृत्वाच्या आठवणींना उजाळा दिला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापक अशोक पोले यांनी केले, तर आभार प्रदर्शन पर्यवेक्षक दिलीप राठोड यांनी मानले.

या कार्यक्रमाला शिक्षण संकुलातील प्राचार्य, मुख्याध्यापक, पर्यवेक्षक, प्राध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# सर्वधर्मीय कार्यकर्त्यांच्या सत्कारातून सामाजिक एकोप्याचा संदेश

## शेंबाळपिंपरी येथे जैनुल भाई सिद्दीकी मित्र मंडळाचा उपक्रम

प्रतिनिधी ३ जुलै



**पुसद :** शेंबाळपिंपरी येथे सामाजिक सलोखा, बंधुभाव आणि सर्वधर्मसमभावाचा संदेश देणारा सर्वधर्मीय प्रभावी कार्यकर्त्यांचा सत्कार सोहळा उत्साहात पार पडला. शेंबाळपिंपरी, देवगव्हाण (जुने) व हिवळणी (पा.) परिसरातील विविध समाजातील कार्यकर्त्यांचा एकाच दिवशी जन्मदिवस असल्याच्या औचित्याने जैनुल भाई सिद्दीकी मित्र मंडळाच्या वतीने त्यांच्या निवासस्थानी या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सरपंच तथा प्रशासक रविंद्र महल्ले होते. यावेळी राजे दिलीपराव दादा देशमुख, रोशन ट्रेडिंग कंपनीचे संचालक मुनीरोदीन सिद्दीकी, दैनिक नवराष्ट्रचे पत्रकार गुलाबराव वाहुळे, ज्येष्ठ वैद्यकीय तज्ज्ञ डॉ. नंदकुमार देशमुख, सामाजिक कार्यकर्ते रऊफोदीन सिद्दीकी, जामा मस्जिद कमिटीचे सदस्य निसारोदीन सिद्दीकी तसेच शासकीय कंत्राटदार राजेश चंदेल यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी रामकृष्ण चंदेल, बापुरावजी कांबळे, सुनील वाहुळे, सय्यद समीर, निवृत्ती वाहुळे, संतोष मुकींदा मनवर, देविदास कांबळे, संदीप सदावर्ते, संजय विनकरे, संतोष राघोजी मनवर, चंद्रमणी इंगोले, सय्यद वसीम, डी. के. कांबळे, रमेश बैस आणि प्रभाकर कांबळे यांचा शाल व पुष्पहार देऊन सत्कार करण्यात आला. भारतीय वैद्यकीय दिनानिमित्त डॉ. नंदकुमार देशमुख यांचाही विशेष सन्मान करण्यात आला.

सत्काराला उत्तर देताना रामकृष्ण चंदेल व बापुरावजी कांबळे यांनी आयोजकांचे आभार मानले. राजे दिलीपराव देशमुख आणि गुलाबराव वाहुळे यांनी मनोगत व्यक्त करत अशा उपक्रमांमुळे समाजात ऐक्य, बंधुभाव आणि परस्पर विश्वास दृढ होत असल्याचे सांगितले.

अध्यक्षीय समारोपात रविंद्र महल्ले यांनी विविध धर्म व समाजातील कार्यकर्त्यांना एकत्र आणून त्यांचा सन्मान करण्याचा उपक्रम सामाजिक सलोखा आणि एकोप्याचा आदर्श संदेश देणारा असल्याचे नमूद केले. जैनुल भाई सिद्दीकी यांनी समाजात बंधुभाव वृद्धिंगत करण्यासाठी राबविलेल्या या उपक्रमाचे त्यांनी विशेष कौतुक केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक जैनुल भाई सिद्दीकी यांनी केले.

सूत्रसंचालन राजेश वाहुळे यांनी, तर आभार प्रदर्शन फयाज सिद्दीकी यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी हाफीज मुजफ्फरोदीन सिद्दीकी, शेख उबेद, गणेश कांबळे तसेच मित्र मंडळाच्या कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले.

# स्मार्ट मीटर बसविण्याची सक्ती थांबवा; मनसेचा महावितरणला इशारा

प्रतिनिधी ३ जुलै



**आर्णी :** आर्णी तालुका व शहरात महावितरणकडून सुरू असलेली स्मार्ट मीटर बसविण्याची सक्ती तातडीने थांबवावी, अशी मागणी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने केली आहे. यासंदर्भात उपअभियंता, महावितरण कार्यालय, आर्णी यांना निवेदन देण्यात आले.

निवेदनात, ग्रामीण भागात सुमारे ७० टक्के तर शहरी भागात २५ टक्के स्मार्ट मीटर बसविण्यात आल्याचा दावा करण्यात आला आहे. ग्राहकांना कोणतीही पूर्वमाहिती अथवा संमती न घेता ही मोहीम राबविली जात असल्याचा आरोप मनसेच्या पदाधिकाऱ्यांनी केला आहे.

स्मार्ट मीटरमुळे वीज ग्राहकांना वाढीव बिले येत असल्याची तक्रार नागरिकांकडून होत असल्याचेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे. तसेच, मुख्यमंत्री यांनी विधानसभेत केलेल्या वक्तव्याकडे दुर्लक्ष करून स्मार्ट मीटर बसविण्याची प्रक्रिया सुरू असल्याचा आरोप करण्यात आला आहे.

स्मार्ट मीटर बसविण्याची सक्ती तातडीने थांबविण्यात यावी, अन्यथा महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने वीज ग्राहकांना सोबत घेऊन तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा निवेदनातून देण्यात आला आहे.

यावेळी सचिन यलगंधेवार, कपिल ठाकरे, आकाश माटलवार, शुभम मोरे आणि सतीश सुब्रवार उपस्थित होते.

# सिटी न्यूज अमरावती

शुक्रवार, दि. ३ जुलै २०२६

http://epaper.citynewssuperfast.com


## वसंतराव नाईक जयंती व दादासाहेब खापर्डे यांची पुण्यतिथी निमित्य हारार्पण कार्यक्रम संपन्न

**अमरावती:** १ जुलै, २०२६ रोजी वसंतराव नाईक यांच्या जयंती निमित्य वसंतराव नाईक यांच्या प्रतिमेस हारार्पण मा.महापौर श्रीचंद तेजवानी यांचे हस्ते विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर सभागृह येथे करण्यात आले. तसेच दादासाहेब खापर्डे यांच्या पुण्यतिथी निमित्य राजकमल चौकातील दादासाहेब खापर्डे यांच्या पुतळ्याला हारार्पण करण्यात आले. यावेळी महानगरपालिका आयुक्त वर्षा लड्डा, सभागृह नेता चेतन गावंडे, विरोधी पक्षनेता विलास इंगोले, अतिरिक्त आयुक्त महेश देशमुख, उपायुक्त नरेंद्र वानखडे, उपायुक्त योगेश पिठे, सहाय्यक आयुक्त भुषण पुसतकर, माजी नगरसेवक बबन रडके, दिनेश यशवंत खापर्डे, राजेंद्रभाऊ परिहार, प्रमोद मोहोड, भुषण खडेकार, अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

# 400 खाटांच्या नवीन डफरीन हॉस्पीटलमध्ये पदस्थापना कधी करणार?

## आ. सुलभा खोडकेंचा प्रश्न; बैठक लावण्याबाबत आरोग्यमंत्री ना. प्रकाश आबिटकर यांची घोषणा

प्रतिनिधी ३ जुलै

**अमरावती:** जिल्ह्यातील सर्वात मोठे प्रसुतालय असलेल्या जिल्हा स्त्री रुग्णालय (डफरीन ) येथील वैद्यकीय डॉक्टर व परिचारिकांच्या रिक्त पदाचे ग्रहण आता लवकरच सुटणार आहे. या संदर्भात अमरावतीच्या आमदार - सौ.सुलभाताई संजय खोडके यांनी सातत्याने विधानसभेत प्रश्न मांडून शासनाचे लक्ष वेधले असल्याने डफरीन मधील रिक्त डॉक्टर व परिचारिकांच्या पदस्थापनेबाबत बैठक बोलाविण्याची घोषणा आरोग्यमंत्री ना. प्रकाशजी आबिटकर यांनी राज्यविधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनातून केली आहे.

अमरावती येथील जिल्हा स्त्री रुग्णालयात ग्रामीण भागापासून ते शहरी तसेच धारणी -मेळघाट व मध्यप्रदेशाच्या सीमाभागातून महिला प्रसूतीकरिता दाखल होतात. या रुग्णालयात महिला रुग्णांची संख्या वाढत असल्याने नुकतेच वर्ष २०२४ मध्ये डफरीन रुग्णालयाची ४०० खाटांची नवीन इमारत साकारून आरोग्याच्या सर्व सुविधायुक्त रुग्णालय कार्यान्वित करण्यात आले. मात्र डॉक्टर व परिचारिकांच्या कमतरतेमुळे महिला रुग्णाचा एवढा मोठा डोलारा सांभाळतांना सद्यस्थितीतील आरोग्य यंत्रणेला कसरत करावी लागत लागत आहे.त्यामुळे डफरीन रुग्णालयात रिक्त डॉक्टर व परिचारिकांच्या पदस्थापनेचा प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यात आला



असता आ.सौ. सुलभाताई खोडके यांनी यासंदर्भात शासनाकडे सातत्याने पाठपुरावा करून विधानसभेत सुद्धा मुद्दा उपस्थित केला. दरम्यान राज्यविधीमंडळाच्या पावसाळी अधिवेशनात आज बुधवार दिनांक ०१ जुलै २०२६ रोजीच्या प्रश्नोत्तरात आमदार सौ. सुलभाताई खोडके यांनी डफरीन रुग्णालयातील डॉक्टर व नर्स यांच्या पदस्थापनेसंदर्भात पुनरोच्चार केला.

यावर सभागृहात उपस्थित राज्याचे सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याणमंत्री ना. प्रकाशजी आबिटकर यांनी जिल्हा स्त्री रुग्णालय अमरावतीमधील रिक्त डॉक्टर व परिचारिकांच्या पदस्थापनेसंदर्भात बैठक लावण्याबाबतची घोषणा केली. तसेच डफरीन रुग्णालयात काही आवश्यक नवीन पदे प्रस्तावित करण्याबाबत सुद्धा बैठकीच्या माध्यमातून सकारात्मक कार्यवाही करणार असल्याचे मंत्रीमहोदयांनी सभागृहात सांगितले. अमरावती येथील जिल्हा स्त्री रुग्णालय , जिल्हा सामान्य रुग्णालय (इर्विन ) व सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल मध्ये नागरीकांच्या सर्व सुविधांच्या अनुषंगाने सर्व उपाययोजना करण्याबाबतही मंत्री. ना.प्रकाश आबिटकर यांनी सभागृहातून विश्वास दर्शविला.

आज बुधवार दिनांक १ जुलै २०२६ रोजी राष्ट्रीय डॉक्टर दिवस असल्याने आरोग्य मंत्र्यांच्या बैठकीनंतर डफरीन हॉस्पिटलला मेडिकल स्टाफचे स्पेशल गिफ्ट मिळणार आहे. त्यामुळे गेल्या अनेक वर्षांपासून डफरीन हॉस्पिटल मधील डॉक्टर व परिचारिकांच्या रिक्त पदांचे ग्रहण आता आ .सुलभा खोडके यांच्या पाठपुराव्याने सुटणार आहे.

# युवा मोर्चा शहराध्यक्ष मृणाल इंगळे यांच्या पाठपुराव्याला यश; खतांचा बफर स्टॉक खुला होणार

प्रतिनिधी ३ जुलै

**दर्यापूर :** खरीप हंगामात जिल्ह्यातील शेतकऱ्यांना युरिया आणि डीएपी खतांची टंचाई भासू नये, यासाठी भाजप युवा मोर्चा दऱ्यापूर शहराध्यक्ष मृणाल मनोहरराव इंगळे यांनी कृषी विभागाकडे आक्रमक पाठपुरावा केला होता. त्यांच्या या निवेदनाची जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी कार्यालयाने तातडीने दखल घेतली आहे.

महत्त्वाचे निर्णय: मृणाल इंगळे यांच्या मागणीमुळे डीएपी (DAP) खताचा बफर स्टॉक १५ जुलै पूर्वी तर युरियाचा साठा १५ ऑगस्ट पूर्वी विक्रीसाठी खुला करण्याचे नियोजन कृषी विभागाने जाहीर केले आहे.

जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखालील समितीमार्फत हे खत वितरण अत्यंत पारदर्शक पद्धतीने थेट शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवले जाईल. ऐन हंगामात शेतकऱ्यांची अडचण ओळखून वेळेवर धावून जाणाऱ्या युवा नेते मृणाल इंगळे यांच्या या तत्परतेबद्दल संपूर्ण दऱ्यापूर तालुक्यातून आणि शेतकरी वर्गातून त्यांच्यावर कौतुकाचा वर्षाव होत आहे.

# जबरी चोरीच्या गुन्ह्यातील विधीसंघर्षित बालकास घेतले ताब्यात

## अमरावती शहर गुन्हे शाखेची कारवाई

प्रतिनिधी ३ जुलै

**अमरावती :** ०१/०७/२०२६ रोजी पोस्टे फ्रेजरपुरा हददीमधील मंगलधाम येथे फिर्यादी देवनाराय शिवचरण पांडे वय ७२ वर्ष रा. उषा कॉलनी, लॉर्ड हॉटेल जवळ, अमरावती यांनी पोस्टे ला येवुन जबानी रिपोर्ट दिला कि, फिर्यादी हे त्याचे साळु यांचे नविन बांधकाम सुरू असल्याने तीथे चौकीदार म्हणुन कामाला आहे. फिर्यादी हे दिनांक ३०.०६.२०२६ रोजी १० वा जेवण करूण बांधकामाच्या ठिकाणी झोपले होते. दिनांक १ जुले रोजी रात्री २ वा. दरम्याण तेथे चार इसम आले व फिर्यादी यांना झोपेतुन उठवुन लाकडी बांबु उचलुन मारहान करण्यास सुरवात केली फिर्यादी यांनी का मारता विचारले असता आरोपी यांनी पुन्हा मारहान केली व एका आरोपीने फिर्यादी यांचे खीश्यातील १,०५०/- रू नगदी जबरीने काढून घेतले व बांधकाम येथील लोखंडी पंलग व प्लास्टीकच्या खुर्च्य तोडल्या व इतर साहीत्याचे नुकसान केले. फिर्यादी यांनी समजावीण्याचा प्रयत्न केला आरोपी यांनी फिर्यादीस पुन्हा शिवीगाळ व मारहान केली. फिर्यादी यांची कॉलर पकडुन त्याच्या गळयातील बेन्टेक्सची चैन तोडुन घेतली व फिर्यादी यांना शिवागाळ करूण पून्हा इथे दिसायचे नाही अशी धमकी देवुन आरोपी हे निघुन गेले फिर्यादीच्या जबानी रिर्पाट वरूण पोस्टे फेजरपुरा येथे अप.कं.५१४/२०२६ कलम ३०९ (६), ३२४ (४), ३५१(२), ३५२, ३(५)बि.एन.एस.एस. अन्वये गुन्हा दाखल झाला होता.

सदर गुन्हयाचा संमातर तपास हा गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक अतुल वर यांच्या नेतृत्वात गुन्हे शाखेचे पथक करीत असताना गुन्हे शाखेच्या पथकास आज दि.०२.०७.२०२६ रोजी गोपनीय बातमीदारा मार्फत माहीती मिळाली कि सदरचा गुन्हा हा महादेव खोरी येथील विधी संघर्षित बालक याने त्याच्या इतर साथिदारासह केला असल्याचे सांगीतले. वरून गुन्हे शाखेचे पथक हे लागलीच महादेव खोरी परिसरा मधुन विधी संघर्षित बालक याचा शोध घेवुन ताब्यात घेण्यात आले व त्यास सदर गुन्हया बाबत विश्वासात घेवुन सखोल विचारणा केली असता त्याने त्याचा मित्र श्रावण बनारसे व इतर साथिदारासह गुन्हा केल्याचे कबुली दिल्याने सदर विधी संघर्षित बालकास गुन्हयाच्या पुढिल तपास कामी पोस्टे फ्रेजरपुरा यांचे ताब्यात देण्यात आले.

सदरची कारवाई पोलीस आयुक्त राकेश ओला अमरावती शहर यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस उपायुक्त (परिमंडळ ०१) यशवंत सोळंके, पोलीस उपायुक्त (परिमंडळ ०२) श्याम घुगे, पोलीस उपायुक्त मुख्यालय तथा गुन्हे प्रांजली सोनवणे, सपोआ (गुन्हे शाखा) कैलास पुंडकर, यांचे मार्गदर्शनात करण्यात आली.

# महिलेचे पर्स मधून सोने चोरी करणारे आरोपी अटकेत

## पोलिसांचा यशस्वी तपास

प्रतिनिधी ३ जुलै

**अमरावती :** ३ जून रोजी फिर्यादी वैशाली सुरेश जंवजाळ वय ४५ वर्ष रा. चिखलदरा अमरावती हि आपल्या मुली सोबत सांयकाळी ०७.३० वा. बापट चौक येथे काही सामान खरेदी करण्या करिता आली व बापट चौक येथुन सामान खरेदी करुन नमुना गल्ली कडे जाणारा रोड सपना फुटवेअर च्या जवळ फुटपाथ वरिल चपलाच्या दुकानातुन चप्पल पसंद केली तेव्हा पैसे देण्याकरिता आपली पर्स उघडली असता पर्स मधे ठेवलेले सोन्याचे दागीने अंदाजे वजनी २३ ग्रॅम. असे दिसुन आले नाही. करिता कोणीतरि अज्ञात चोराने चोरुन नेले असल्याने फिर्यादीने पोस्टेला तक्रार दिल्या वरुन पोस्टे ला. अप.क्र.



२५०/२०२६ कलम ३०३ (२) बी.एन.एस. प्रमाणे दाखल आहे.

पोस्टे. सिटी कोतवाली येथे दि.२९/०९/२०२५ फिर्यादी असमा बी शेख अकील वय २८ वर्ष रा. वलगाव अमरावती हिने रिपोर्ट दिला कि दि. २९/०६/२०२६ रोजी दुपारी अंदाजे ०१.०० वा. दरम्यान फिर्यादी व फि ची पत्नी आधार कार्ड अपडेट करण्या करिता अमरावती जुनी तहसील येथे आले व त्या ठीकाणी आधार कार्ड अपडेट करण्याच्या लाईन मध्ये दोघेही उभे असता फिच्या पतीने फिर्यादीला सही करण्या करिता पेन मागीतले असता फिर्यादीने ज्या पर्स मध्ये सोन्याचे दागीने ठेवले होते ती बॅग पेन घेण्याकरिता उघडली असता त्या मधील सोन्याचे दागीने अंदाजे वजनी ८.५ ग्रॅम. असे दिसून आले नाही कोणी तरि अज्ञात चोराने चोरुन नेले असे फिर्यादीचे रिपोर्ट वरुन पोस्टे ला अप.क्र. क्र. ३६५/२०२५ कलम ३०३ (२) बि.एन.एस. प्रमाणे दाखल आहे.

सदर गुन्ह्याचा वरिष्ठाच्या मार्गदर्शना प्रमाणे तात्रीक बाबीच्या व गुप्त बातमी दाराकडुन प्राप्त झालेल्या माहीतीच्या आधारे सखोल तपास केला त्या प्रमाणे निष्पन्न बाबी नुसार गुन्ह्यातील आरोपी नामे उमेश शिवलिंगदास भोसले वय २२ वर्ष रा. राजुरा पारधी बेडा अमरावती यास ताब्यात घेउन विचारपुस केली असता त्याने वरिल प्रमाणेचे दोन्ही गुन्हे केले असल्याची कबुली दिली तसेच तपासा दरम्यान नमुद आरोपीता कडुन दोन्ही गुन्ह्यातील एकुण २८ ग्रॅम वजनाचा सोन्या या धातुचा कि. अ. ४,२०,०००/ रु. चा मुद्देमाल जप्तीपंचनामा प्रमाणे जप्त करण्यात आला.

# आदिवासी मुलांची तस्करी उघडकीस आणल्याने जिवे मारण्याची धमकी

## ◆ फोनवरून अश्लील शिवीगाळ; धारणी पोलिसांत तक्रार, प्रकल्प अधिकारी सिद्धार्थ शुक्ला यांनी दिली माहिती

प्रतिनिधी ३ जुलै

**हरिसाल (अमरावती):** मेळघाटच्या आदिवासी मुलांची 'शैक्षणिक तस्करी' उघडकीस आणल्याबद्दल स्थानिक प्रतिनिधीला थेट जिवे मारण्याची धमकी देण्यात आल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला. ३० जूनला लोकमतमध्ये वृत्त प्रकाशित होताच त्याच दिवशी सायंकाळी ६ च्या सुमारास मोबाईलवरून अश्लील शिवीगाळ करीत जिवे मारण्याची धमकी अज्ञात व्यक्तीने दिली. याबाबत धारणी पोलिस ठाण्यात तक्रार देण्यात आली तसेच एकात्मिक आदिवासी प्रकल्प अधिकारी सिद्धार्थ शुक्ला यांनाही माहिती देण्यात आली आहे.

हरिसाल बस स्टँडवरून २९ जून रोजी मेळघाटातील २०० हून अधिक मुले बेकायदेशीरपणे वर्धा जिल्ह्यात नेली जात असल्याचे प्रकाशित झाली. त्याच दिवशी धमकीसत्र सुरू झाले. या गंभीर प्रकाराची माहिती प्रकल्प अधिकारी सिद्धार्थ शुक्ला यांनाही देण्यात आली असून धारणी पोलिसांत दाखल एफआयआरची प्रत त्यांच्याकडे पाठवण्यात आली आहे.

**काय आहे मेळघाट प्रकरण?**

**मेळघाटची ही मुले ज्या अहिल्यादेवी होळकर अनुदानित आदिवासी आश्रमशाळा (उखळी, ता. हिंगणा, जि. नागपूर) येथे नेली जात होती, त्या शाळेची कायमस्वरूपी मान्यता रद्द का करू नये, अशी नोटीस आयुक्त लीना बनसोड यांनी २५ ऑगस्ट २०२५ रोजी बजावली.**

शाळेची इमारत त्यापूर्वी १८ ऑगस्ट रोजी पहाटे कोसळली. त्याच धोकादायक हॉलमध्ये ३३१ विद्यार्थी जेवतात. शाळेत बोगस भरती, अनुदानाचा अपहार, अँटी करप्शनचा गुन्हा असताना मुकेश मते याला पगार असे प्रकार उघड झाले आहेत. प्रकल्प अधिकारी, नागपूर यांनी २२ सप्टेंबर २०२५ रोजी पत्र काढून शाळेचे वर्धा जिल्ह्यातील स्थलांतर बेकायदेशीर ठरवून त्यास प्रतिबंध घातला आहे.

# रहाटगाव येथे ऑनलाईन चक्री जुगार तसेच लक्ष्मी नगर येथे वरली मटका जुगारावर छापा

## ◆ जुगार साहीत्य व आरोपी ताब्यात, शहर शाखेची कारवाई

प्रतिनिधी ३ जुलै

**अमरावती :** गुन्हे शाखा, अमरावती शहर येथील अधिकारी व अंमलदार हे अवैध धंदे तसेच अवैध शस्त्र बाळगणारे यांचेवर कारवाई करणे कामी आयुक्तालय हद्दीत पेट्रोलिंग करीत असता गुप्त बातमीदारा कडून गोपनिय माहिती प्राप्त झाली की, एक इसम हा फोर सिजन हॉटेलचे खाली मार्केटमध्ये एका दुकानात अवैधरित्या ऑनलाईन चक्री जुगार खेळवित आहे. अशा खात्रीशीर माहिती वरुन सदर ठिकाणी रेड केली असता तेथे एक इसम टि.व्ही. स्क्रिनवर ऑनलाईन चक्री जुगार खेळवितांना तसेच एक इसम खेळतांना मिळून आल्याने दोन्ही आरोपीतांना ताब्यात घेण्यात आले तसेच ऑनलाईन चक्री जुगाराचे साहित्य व नगदी असा एकूण २७०८०/-रु. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. आरोपी व जप्त मुद्देमाल पुढील तपासकामी पो.स्टे. नांदगांवपेठ यांचे ताब्यात देण्यात आला. वरुन पो.स्टे. नांदगांवपेठ येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे. ऑनलाईन चक्री जुगारामध्ये ताब्यात घेण्यात आलेल्या आरोपी चे नाव साहील सुधिर सरवैया, वय २६ वर्षे, रा. विलास नगर, अमरावती, उमेश उर्फ बंटी रमेश पवार, वय ३५ वर्षे, रा. लोहार लाईन, विलास नगर, अमरावती तसेच एक इसम हा लक्ष्मी नगर येथे त्याचे राहते घरासमोर लोकांकडून पैसे घेवून वरली मटका जुगार चालवित आहे. अशा खात्रीशीर माहिती वरुन सदर ठिकाणी रेड केली असता तेथे एक इसम हा लोकांकडून पैसे घेवून वरली मटक्याच्या चिठ्ठया देतांना मिळून आल्याने त्यास ताब्यात घेण्यात आले त्याचे ताब्यातून जुगाराचे साहित्य व नगदी असा एकूण ८४०/-रु. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. आरोपी व जप्त मुद्देमाल पुढील तपासकामी पो.स्टे. गाडगेनगर यांचे ताब्यात देण्यात आला. वरुन पो.स्टे. गाडगेनगर येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

वरली मटका जुगारामध्ये ताब्यात घेण्यात आलेल्या आरोपी चे नाव अशोक चंदनलाल जयस्वाल, वय ६४ वर्ष रा. लक्ष्मी नगर, अमरावती सदरची कारवाई पोलीस आयुक्त, राकेश ओला, पोलीस उपआयुक्त यशवंत सोळंके (परिमंडळ ०१), श्रीमती प्रांजली सोनवणे, पोलीस उपाआयुक्त (मुख्यालय), सहायक पोलीस आयुक्त, (गुन्हे विभाग) कैलास फुंडकर, तसेच सहायक पोलीस आयुक्त, ब्राम्हणे यांचे मार्गदर्शनाखाली पो.नि. दिनेश दहातोंडे, सपोनि मनीष वाकोडे, सपोनि दशरथ आडे, सहा. पोउपनि फिरोज खान, पोहवा संभाजी केन्द्रे, पोहवा मंगेश लोखंडे, पो.हे. कॉ. नाझीमउददीन सैयद, पो.ना. सचिन भोयर, रंजित गावंडे, निखील गेडामचालक- चेतन शर्मा, गुन्हे शाखा, अमरावती शहर यांनी केलेली आहे.

# उच्च न्यायालयातून बलात्काराचे प्रकरण खारीज

प्रतिनिधी ३ जुलै


**अमरावती :** पोलीस स्टेशन गाडगे नगर येथे दाखल गुन्ह्यात तक्रार अशी तक्रार कर्ती ह्यांनी असे केले की, दि. १७/०२/२०२२ रोजी तक्रार कर्ती ह्यांची आरोपी सोबत ओळख झाली. त्यानंतर आरोपीने तक्रार कर्तीचे मोबाईल क्रमांक मिळविला व त्यांना फोन करुन त्यांच्याशी मैत्री केली. त्यानंतर आरोपीने तक्रार कर्तीशी जवळिक साधली. व त्याने आश्वासन दिले की तुझ्या दोन्ही मुलांसह स्वीकारुन लग्न करतो. असे म्हणुन तक्रार कर्ती शी ०६/०८/२०२३ रोजी संध्याकाळी ५/३० वा. दरम्यान तक्रार कर्ती ह्यांच्या घरी अमरावती येथे पहील्यांदा जबरदस्तीने शारीरीक संबंध केले. त्यानंतर आरोपी तक्रार कर्तीच्या फ्लॅटवर नेहमी यायचा व त्यांच्या सोबत पती सारखे राहत होता. आरोपी हा वकिलीचे शिक्षण घेत असुन त्याने ब-याच वेळा कायद्याचे ज्ञान आहे. तु माझे काहीच वाकडे करु शकत नाही. मी तुझी नोकरी गोत्यात आणेन तुला व मुलालंना जिवाने मारुन टाकीन असा धमक्या देऊन तक्रार कर्ती सोबत त्यांच्या इच्छेविरुदध वारंवार जबरदस्तीने शारीरीक संबंध केले. अपार्टमेंट मध्ये प्लॅट भाड्याने घेऊन त्यामध्ये त्यांचे सामान ठेवले होते. तेथे दि. १३/१०/२०२४ रोजी आरोपी आला होता. तेव्हा तक्रार कर्तीसोबत मी तुझ्यासोबत लग्न करतो असे लग्नाचे आमिष देऊन त्यांचे सोबत शारीरीक संबंध केले. तक्रार कर्ती च्या वहिनिला व जावई यांना वैभव फोन करुन व भेटुन सांगत होता की तो तक्रार कर्तीसोबत लग्न करणार आहे. तिच्या साठी तुम्ही लग्नाकरीता मुले बघु नका परंतु दोन वर्षापासुन अद्याप पावेतो त्याने तक्रार कर्ती सोबत लग्न केले नाही. म्हणून तक्रार कर्ती ह्यांनी आरोपी विरुद्ध गाडगे नगर पोलीस स्टेशन येथे तक्रार दाखल केली आणि कलम ६४(२)(म) ६९ आणि ३५१(३) भारतीय न्याय संहिता अंतर्गत गुन्हा नोंद करण्यात आला.

# अन्नदात्याला आर्थिक आधार

शेतकरी हा अर्थव्यवस्थेचा महत्त्वाचा घटक आहे. राज्याची ग्रामीण अर्थव्यवस्था मोठ्या प्रमाणावर शेती व त्यासंबधित पुरक व्यवसायावर अवलंबून आहे. अतिवृष्टी, अनियमित पाऊस, महापुर, दुष्काळ, नैसर्गिक संकटे आणि गारपीट यामुळे शेती उत्पादनावर मोठा परिणाम होत असल्याने, परिणामी शेतकऱ्यांना आर्थिक अडचणींना सामोरे जावे लागते आणि अनेकवेळा शेतकऱ्यांना घेण्यात आलेल्या कर्जाची वेळेत परतफेड करणे कठीण होते. या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र शासनाने 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना, २०२६' जाहीर केली आहे. या योजनेचा मुख्य उद्देश शेतकऱ्यांवरील कर्जाचा भार कमी करणे आणि त्यांना आर्थिक स्थैर्य मिळवून देणे हा आहे.

यापूर्वी शासनाने छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजना (२०१७), महात्मा ज्योतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजना (२०१९) आणि प्रोत्साहनपर लाभ योजना (२०२२) अशा विविध योजनांच्या माध्यमातून शेतकऱ्यांना मदत केली आहे. मात्र, कर्जमुक्तीनंतरही काही शेतकरी पुन्हा कर्जाच्या चक्रात अडकत असल्याचे शासनाच्या निदर्शनास आले. त्यामुळे केवळ कर्जमाफी न करता शेतकऱ्यांना कायमस्वरूपी आर्थिक सक्षम करण्यासाठी दीर्घकालीन उपाययोजनांची गरज शासनाने व्यक्त केली आहे.

या योजनेंतर्गत दि. ३० सप्टेंबर २०२५ रोजी पीक कर्ज थकीत असलेल्या पात्र शेतकऱ्यांना २ लाख रुपयांपर्यंत कर्जमुक्तीचा लाभ देण्याची घोषणा करण्यात आली आहे. तसेच, वेळेवर कर्जाची नियमित परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी ५० हजार रुपयांपर्यंत प्रोत्साहनपर लाभ




देण्यात येणार आहे. या योजनेचे आणखी एक महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे शेतकऱ्यांना वारंवार कर्जबाजारी होण्यापासून रोखण्यासाठी दीर्घकालीन उपाययोजना करण्यात येणार आहेत. यामध्ये शेती क्षेत्र अधिक सक्षम करणे, बँकिंग व्यवस्था मजबूत करणे आणि शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी उपाय करणे यावर भर देण्यात आला आहे.

कर्जमुक्ती, एकवेळ समझोता (OTS) व प्रोत्साहनपर लाभ मिळण्यासाठी निकष निश्चित करण्यात आले आहेत. या योजनेचा लाभ मिळण्यासाठी जे शेतकरी पात्र असणार नाहीत याबाबतच्या अटी व शर्ती ठरविण्यात आलेल्या आहेत. योजनेची अंमलबजावणी प्रक्रिया संपूर्णपणे ऑनलाईन पध्दतीने करण्यात येणार आहेत. यासाठी शेतकऱ्यांचे आधार प्रमाणीकरण करण्यात येणार असून, कर्जमाफीची रक्कम थेट त्यांच्या बँकखात्यात जमा करण्यात येणार आहे. सद्यस्थितीत कर्जखातेदार शेतकऱ्यांच्या याद्या शासनाच्या कर्जमुक्ती पोर्टलवर अपलोड करण्याचे काम युध्दपातळीवर सुरु आहे.

या योजनेचा आढावा घेणे, निकषात बदल करण्यासाठी मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली मंत्रिमंडळ उपसमिती गठीत करण्यात आली आहे. तसेच राज्यातील शेतकऱ्यांना कृषी कर्जपुरवठा करणे हे सहकार विभागाचे प्रमुख कार्य असल्याने सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, पुणे यांच्या स्तरावर कृषी कर्जासाठी सहकार आधार सामुग्री संचयिका (सहकार स्टॅक) स्थापित करण्यात आले आहे.

शेतकरी हा राज्याच्या विकासाचा केंद्रबिंदू आहे. त्यामुळे कर्जाचा ताण कमी करून त्याला नव्या उमेदीने शेती करण्याची संधी देणे हे या योजनेचे मोठे उद्दिष्ट आहे. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या नावाने सुरू करण्यात आलेली ही योजना शेतकऱ्यांच्या जीवनात सकारात्मक बदल घडवून आणण्याच्या दिशेने एक महत्त्वाचे पाऊल ठरू शकते.

**विभागीय माहिती कार्यालय, अमरावती**

# शिराळा येथील घातक, धारदार शस्त्रे बाळगणारा इसम ताब्यात

प्रतिनिधी ३ जुलै

**अमरावती :** गुन्हे शाखा, अमरावती शहर येथील अधिकारी व अंमलदार हे अवैध धंदे तसेच अवैध शस्त्र बाळगणारे यांचेवर कारवाई करणे कामी आयुक्तालय हद्दीत पेट्रोलिंग करीत असता गुप्त बातमीदारा कडून गोपनिय माहिती प्राप्त झाली की, ग्राम शिराळा येथील रोहीत राठोड नावाचा एक ईसम हा त्याचे घरात अवैध शस्त्रे बाळगत आहे. सदरची माहीती ही खात्रीशीर असल्याने माहिती प्रमाणे गुन्हे शाखेचे अधिकारी व अंमलदार ग्राम शिराळा येथे गेले व माहिती प्रमाणे इसमाचे घराचा शोध घेतला असता शिराळा येथील वार्ड कं. ६, शिराळा येथे सदर इसमाचे घर मिळून आल्याने सदर इसमाचे घराची झडती घेतली असता लोखंडी मोठी तलवार तसेच एक लोखंडी मोठा कोयता मिळून आल्याने सदर शस्त्रे ताब्यात घेवून जप्त करण्यात आली व अवैध



शस्त्रेबाळगणारा इसम यास ताब्यात घेण्यात आले तसेच आरोपी व जप्त मुद्देमाल पुढील कारवाई करीता पो.स्टे. वलगांव यांचे ताब्यात देण्यात आले.

ताब्यात घेण्यात आलेल्या आरोपी चे नाव रोहीत शिवदास राठोड, वय २२ वर्षे, रा. ग्राम शिराळा, वार्ड कं. ०६, ता. जि. अमरावती असे असून ही कारवाई पोलीस आयुक्त, राकेश ओला, पोलीस उपआयुक्त यशवंत सोळंके (परिमंडळ १), प्रांजली सोनावणे, पोलीस उपाआयुक्त (मुख्यालय),. सहायक पोलीस आयुक्त, (गुन्हे विभाग) कैलास फुंडकर तसेचसहायक पोलीस आयुक्त, (गाडगेनगर विभाग) . निलेश ब्राम्हणे सा. यांचे मार्गदर्शनाखाली पो. नि. दिनेश दहातोंडे, सपोनि मनीष वाकोडे, सपोनि दशरथ आडे, सहा. पोउपनि फिरोन खान, पोहवा संभाजी केन्द्रे, पोहवा मंगेश लोखंडे, पो.ना. सचिन भोयर, पोलीस अमलदार रंजित गावंडे, सागर ठाकरे, नरेश मोहरिल, सुरज चव्हाण, निखील गेडाम, चालक- चेतन शर्मा, प्रभात पोकळे गुन्हे शाखा, अमरावती शहर यांनी केलेली आहे.

सिटी न्यूज सुपरफास्ट वाशीम
शुक्रवार, दि. ३ जुलै २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

# रिसोड येथील आरोपीचा पोलीस कोठडीत मारहाणीत झालेल्या मृत्यू प्रकरणी...

# ९ पोलिसांना जन्मठेप!

*** न्यायालयाचा इतिहासीक निकाल * बेग्या पवारच्या कुटुंबाला १५ वर्षांनी मिळाला न्याय**

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

वाशिम जिल्हा सत्र न्यायालयानं आज ऐतिहासिक निकाल दिला असून पोलीस कोठडीत मारहाणीत आरोपीचा मृत्यू झाल्याप्रकरणी, ९ पोलिसांना जन्मठेपेची शिक्षा सोनावण्यात आली आहे. वाशिम जिल्हा सत्र न्यायाधीश जयसिंग झपाटे यांनी हा निकाल दिला असून या निकालामुळे पोलीस दलाला मोठा धक्का बसला आहे.





९ मे २०११ रोजी रिसोड पोलीस स्टेशनचे तत्कालीन ठाणेदार ठाणेदार महादेव माणिक धांडे यांच्यासह ८ पोलीस कर्मचाऱ्यांनी हिंगोली जिल्ह्यातील सेनगाव तालुक्यातल्या वाढोणा येथील पारधी वस्तीवर धाड टाकून बेग्या पवार या तरुणाला एका चोरीच्या गुन्ह्यात संशयित म्हणून अटक केली होती. गुन्हा कबूल करण्यासाठी पोलिस कोठडीत केलेल्या मारहाणीत १० मे २०११ रोजी बेग्या पवारचा मृत्यू झाला होता.या प्रकरणात सीआयडी ने ३४ दिवस तपास करून खुणाच्या गुन्ह्यासह स्पेशल अॅट्रॉसिटीचाही गुन्हा पोलिसांवर दाखल केला होता. आता तब्बल १५ वर्ष १ महिना २३ दिवसानंतर या प्रकरणात पीडित कुटुंबाला न्याय मिळाला आहे.बेग्या पवार यांच्या आईनं दिलेल्या माहितीनुसार बेग्यावर यापूर्वी कोणताही गुन्हा दाखल नव्हता. फक्त तो पारधी असल्याच्या कारणानं पोलिसांनी त्याला अडकवण्याचा प्रयन्त केला होता.या प्रकरणात न्यायालयानं आज रिसोड पोलीस स्टेशनचे तत्कालीन ठाणेदार महादेव माणिक धांडे, यांच्यासह पोलीस कर्मचारी मदन केशव पवार,शिवाजी नामदेव खिल्लारी, पंजाब माणिकराव पाटकर,रमेश सीताराम पवार, प्रकाश हिरालाल तारम नागोराव भगवान खांडके,अशोक निवृत्ती वैद्य, वसंत कणिराम जाधव.या ९ जणांना जन्मठेपेची शिक्षा सुनावली आहे.

निकालानंतर बेग्या पवारच्या आई- वडिलांनी न्याय मिळाल्याच सांगत आनंद व्यक्त केला आणि म् तसेच सरकारी वकिलाचे आभार मानलेत.तर हा ऐतिहासिक निकाल असून या निकालामुळं सर्वसामान्यांनाही न्याय मिळतो ही भावना दृढ झाल्याचं या प्रकरणात पीडित कुटुंबीयांची बाजू मांडणारे सरकारी वकील एडवोकेट अभिजीत व्यवहारे एडवोकेट श्रीराम काळू यांनी माध्यमांशी बोलताना सांगितलय.

# भ्रष्टाचारी म्हणून नाव, ट्रॅक्टरचे वाढविले भाव !

**मिनी ट्रॅक्टर खरेदी घोटाळा, पैसा केला गोळा**




समाजकल्याण नव्हे, अधिकाऱ्यांचे स्व-कल्याण
अधिकाऱ्याची 'मनमानी', दररोज पाहिजे 'दानापाणी'!
समाजकल्याण विभागाच्या मिनी ट्रॅक्टर खरेदी प्रकरणात लालची अधिकाऱ्याचे हात 'बरबटलेले'
भ्रष्टाचाराची सवय जडली, ट्रॅक्टरची किंमत वाढली!
समाजकल्याण विभागातील 'कथित' अधिकाऱ्याची अफलातून मागणी
म्हणे, मी सांगतो तेथुन घ्या ट्रॅक्टर, चांगुलपणाचा अॅक्टर, वसुलीचा फॅक्टर!
समाजकल्याण नव्हे 'कथित' अधिकाऱ्याचे स्वकल्याण, फक्त वसुलीवरच ध्यान
समाजकल्याण अधिकारी पैशासाठी लाचार, मिनी ट्रॅक्टर खरेदीत भ्रष्टाचार!
समाजकल्याण नव्हे 'कथित' अधिकाऱ्याचे स्वकल्याण, फक्त वसुलीवरच ध्यान
मिनी ट्रॅक्टरसाठी शासनाकडून ९० टक्के सूट... भ्रष्टअधिकाऱ्याची दुहेरी लूट!
समाजकल्याण नव्हे 'कथित' अधिकाऱ्याचे स्वकल्याण, फक्त वसुलीवरच ध्यान

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

वाशीम जिल्ह्यातील एस.सी.व एस.टी. प्रवर्गातील ५० महिला बचत गटाला आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी शासनाने मिनी ट्रॅक्टर देण्याचा स्तुत्य निर्णय घेतला.परंतु येथील 'कथित' अधिकाऱ्याने त्याच्या दलालीच्या रक्कमेच्या हव्यासापोटी संगनमतात सहभागी असलेल्या छत्रपती संभाजीनगरच्या विक्रेत्याने मिनी ट्रॅक्टरची किंमत वाढवून लालची अधिकाऱ्याला लाखो रूपयाचा मलिदा वाटल्याचा प्रकार निदर्शनास आला आहे.



समाज कल्याण विभागामार्फत महिला बचत गटाच्या सक्षमीकरणासाठी शासनाकडून विविध योजनेच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात अनुदान मिळते. त्या योजना प्रभावीपणे राबवून बचत गटातील सर्व महिलांना फायदा व्हावा आणि त्यांचे आर्थिक जीवनमान उंचावण्यासाठी समाज कल्याण विभागातील जबाबदार अधिकाऱ्यांनी पुढाकार घेण्याची आवश्यक्ता आहे.परंतु वाशीम येथील कार्यरत लालची अधिकाऱ्याने स्व-कल्याणासाठी वाशीम व परिसरातील विविध कंपनीच्या ट्रॅक्टर विक्रेत्यांना डावलून चक्क २५० किलोमीटर दूर असलेल्या छत्रपती संभाजीनगरमधील 'मॅसे फर्ग्यूसन' कंपनीच्या विक्रेत्यासोबत संगनमत करून मिनी ट्रॅक्टरची किंमत वाढवून स्वत:चे उखळ पांढरे करून घेतल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. छत्रपती संभाजीनगरच्या ट्रॅक्टर विक्रेत्याने एका मिनी ट्रॅक्टरची किंमत ३ लाख ८० हजार लावून लालची अधिकाऱ्याला एका ट्रॅक्टरमागे २५ ते ३० हजार रूपयाप्रमाणे लाखो रूपयाचे 'गिफ्ट' म्हणून दिल्याची समाजकल्याण विभागात चर्चा आहे.वाशीम जिल्ह्यातील एस.सी.व एस.टी. प्रवर्गातील पात्र असलेल्या महिला बचत गटाने त्यांच्या हिस्याची १० टक्के रक्कम विक्रेत्याच्या खात्यात जमा केल्याचे समजते.तसेच समाज कल्याण विभागाने सर्व महिला बचत गटाच्या खात्यामध्ये ९० टक्के रक्कमेतील ५० टक्के रक्कम जमा केल्याचे वृत्त आहे. आणि उर्वरित ५० टक्के रक्कम मिनी ट्रॅक्टर बचत गटाला मिळाल्यानंतर त्यांच्या बचत खात्यात जमा होणार असल्याचे समजते. मिनी ट्रॅक्टर घेणाऱ्या महिला बचत गटाला छत्रपती संभाजीनगरला सेवा व दुरूस्तीसाठी ये-जा करणे सोयीचे नसेल्याने अमरावती विभागीच्या समाज कल्याण आयुक्तांनी 'हा' मिनी ट्रॅक्टर खरेदीचा लालची अधिकाऱ्याने स्वत:च्या आर्थिक फायद्यासाठी केलेला व्यवहार त्वरीत रद्द करून वाशीम जिल्ह्यातील एस.सी.व एस.टी.प्रवर्गातील ५० महिला बचत गटांना न्याय द्यावा,दोषी अधिकाऱ्यांवर कडक कारवाई करावी .अशी विविध स्तरातून मागणी होत आहे.

## थोडक्यात

### EWS प्रमाणपत्रासाठी गृह चौकशी अहवालाची सक्ती नको -ग्राहक पंचायत

● सिटी न्युज ब्युरो @ मंगरूळपीर ●

मंगरूळपीर तहसील कार्यालयामार्फत आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक (ऐं) प्रमाणपत्र काढण्यासाठी विद्यार्थी आणि पालकांकडून शासकीय नियमांमध्ये नमूद नसलेल्या गृह चौकशी अहवालाची मागणी केली जात असल्याचा आरोप मंगरूळपीर ग्राहक पंचायतने केला आहे. हा प्रकार तातडीने थांबवावा, अन्यथा गांधीगिरी पद्धतीने आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही संघटनेने दिला आहे.

ग्राहक पंचायतच्या पदाधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, केंद्र शासनाने खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल विद्यार्थ्यांसाठी १० टक्के आरक्षणाची तरतूद केली असून, त्यासाठी आवश्यक असलेल्या EWS प्रमाणपत्रासाठी देशभरात एकसमान कागदपत्रांची यादी आहे. मात्र, मंगरूळपीर तालुक्यात गेल्या तीन-चार वर्षांपासून गृह चौकशी अहवालाची अतिरिक्त मागणी केली जात असल्याचा दावा करण्यात आला आहे.

यासंदर्भात तहसीलदारांनाही तोंडी निवेदन देण्यात आले असून, संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक सूचना देण्याचे आश्वासन मिळाल्याचे ग्राहक पंचायतने म्हटले आहे. मात्र, अद्यापही अतिरिक्त कागदपत्रांची मागणी सुरू असल्याने विद्यार्थी व पालकांची गैरसोय होत असल्याचा दावा करण्यात आला आहे.ही अतिरिक्त कागदपत्रांची मागणी तात्काळ बंद करून 'ऐं' प्रमाणपत्रासाठी शासकीय नियमांनुसारच प्रक्रिया राबवावी, अशी मागणी ग्राहक पंचायतने केली आहे. अन्यथा गांधीगिरी पद्धतीने आंदोलन करण्यात येईल, असा इशारा संघटनेने दिला असून, या परिस्थितीस संबंधित विभागातील अधिकारी जबाबदार राहतील, असेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे. निवेदनात अखिल भारतीय ग्राहक पंचायत मंगरूळपीर तालुका अध्यक्ष संजय राठी, सचिव गजानन व्यवहारे, गणेश राऊत,गोपाल खिराडे उपस्थित होते.

तालुक्यातील नागरिकांनी 'ऐं' काढण्यासाठी गृह चौकशी अहवाल देणे गरजेचे नसून कोणतेही अधिकारी जर आपणास गृह चौकशी अहवाल मागत असेल तर त्यांच्या जवळून लिखित पत्र घ्या व शासकीय परिपत्रकाची मागणी करा व एक तक्रार अखिल भारतीय ग्राहक पंचायत समिती ला द्या गृह चौकशी अहवाल 'ऐं' ला पाहिजे असे कोणतेच शासकीय परिपत्रक नाही.संजय राठी

# काच नदीवर पूर नियंत्रणासाठी संरक्षण भिंत उभारा !

**नदीचे खोलीकरण करा - शिवसेनेचे जिल्हाधिकाऱ्याकडे मागणी**

● सिटी न्युज ब्युरो @ रिसोड ●

रिसोड तालुक्यातील पिंपरी सरहद, कुकसा, अंचल, जोगेश्वरी, नेतंसा, नावली, मांगुळझनक, पेनबोरी, शेलगाव राजगुरे आणि मसलापेन या गावांच्या हद्दीतून वाहणाऱ्या काच नदीमुळे दरवर्षी शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत असल्याचा मुद्दा उपस्थित करत शिवसेना (शिंदे गट) यांच्या वतीने जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले.



निवेदनात म्हटले आहे की, काच नदी पैनगंगा नदीला मिळते. मागील वर्षापासून नदीला वारंवार पूर येत असून त्यामुळे नदीकाठावरील शेतजमिनींचे मोठे नुकसान होत आहे. यंदाही पावसाळ्याच्या सुरुवातीलाच काच व उतावळी नदीला आलेल्या पुरामुळे पेरलेली पिके व शेती वाहून गेली आहे.या नैसर्गिक आपत्तीवर कायमस्वरूपी तोडगा काढण्यासाठी काच नदीवर पूर संरक्षण भिंत उभारणे, नदीचा प्रवाह सुरळीत राहण्यासाठी नदीचे खोलीकरण करणे तसेच पूरग्रस्त शेतकऱ्यांना तातडीने न्याय व मदत देण्याची मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.या गंभीर प्रश्नाची तातडीने दखल घेऊन आवश्यक प्रशासकीय कार्यवाही करावी, अशी मागणी शिवसेना (शिंदे गट) पदाधिकारी व शेतकऱ्यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे केली आहे.


> काच व उतावळी नदीच्या महापुरामुळे शेतकऱ्यांचे सातत्याने होत असलेले नुकसान थांबवण्यासाठी शासनाने तातडीने कायमस्वरूपी उपाययोजना कराव्यात. अन्यथा शेतकऱ्यांच्या न्यायासाठी रस्त्यावर उतरून तीव्र आंदोलन करण्यास आम्ही मागे-पुढे पाहणार नाही.'
>
> **महादेवराव ठाकरे,**
> जिल्हाप्रमुख शिवसेना शिंदे गट

### वनदेवी नगरातील अतिक्रमणावर

# नगरपरिषदेचा बुलडोझर !

● सिटी न्युज ब्युरो @ कारंजा ●

कारंजा शहरातील वनदेवी नगर परिसरात सार्वजनिक रस्त्यांवर करण्यात आलेले अतिक्रमण नगरपरिषदेने थेट बुलडोजर चालवून पाडण्यात आले.अशाच प्रकारे कारंजा शहरात बऱ्याच ठिकाणी नाली व रस्त्यावर अतिक्रमण केले असून त्यावर सुद्धा नगरपरिषद प्रशासनाने कारवाई करावी. वनदेवी नगरामध्ये नगरपरिषद प्रशासन विभागाने केलेले या ठोस कारवाईमुळे अतिक्रमण धारकाचे धाबे दणाणले आहे. कारवाईदरम्यान रस्त्यावर उभारण्यात आलेले अडथळे हटविण्यात आले असून नागरिकांना दिलासा मिळाला आहे. नगरपरिषद प्रशासनाने स्पष्ट इशारा दिला आहे की, सार्वजनिक रस्त्यांवर कोणत्याही प्रकारचे अतिक्रमण खपवून घेतले जाणार नाही.भविष्यात पुन्हा अतिक्रमण आढळल्यास संबंधितांविरुद्ध नियमानुसार कठोर कारवाई करण्यात येईल,असे प्रशासनाने सांगितले आहे.प्रशासनाच्या या धडक कारवाईमुळे परिसरातील वाहतुकीची कोंडी कमी होण्यास मदत झाली असून,नागरिकांनी या निर्णयाचे स्वागत केले आहे.



**अतिक्रमण धारकाचे दणाणले धाबे**

# शेतकऱ्यांच्या प्रगतीसाठी प्रशासनाने समन्वयाने काम करावे- जिल्हाधिकारी

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

शेती आणि शेतकऱ्यांचा विकास हा केवळ शासनाच्या योजनांवर अवलंबून नसून प्रशासन व शेतकरी यांनी उत्कृष्ट समन्वय साधून एकत्रितपणे काम केल्यासच कृषी क्षेत्रात शाश्वत प्रगती साधता येईल. आधुनिक तंत्रज्ञान, नाविन्यपूर्ण शेती पद्धती आणि शासनाच्या विविध योजनांचा प्रभावी लाभ प्रत्येक शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी सर्वांनी एकत्रित प्रयत्न करणे आवश्यक आहे,असे प्रतिपादन जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांनी केले.



कृषी विभाग, जिल्हा परिषद वाशिम यांच्या वतीने १ जुलै रोजी कै. वसंतराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त जिल्हा परिषद सभागृहात कृषी दिन उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अर्पित चौहान होते.

कार्यक्रमास जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी आरिफ शहा, उपविभागीय कृषी अधिकारी संतोष वाळके, उपसंचालक कृषी हिना शेख, उपसंचालक आत्मा निलेश देशमुख, तालुका कृषी अधिकारी जावळे तसेच कृषी विभागाचे अधिकारी, कर्मचारी, प्रगतिशील शेतकरी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# अवैध सावकार, विरोधात सहकार!

## महसूल व पोलिस विभागाची संयुक्त धडक कारवाई

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

अवैध सावकारी व्यवहारांबाबत सहकार विभागाकडे प्राप्त झालेल्या तीन तक्रारींच्या अनुषंगाने महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम, २०१४ च्या कलम १६ अंतर्गत सहकार, महसूल व पोलिस विभागाच्या संयुक्त पथकाने , २ जुलै रोजी सहा ठिकाणी झडतीची कारवाई केली.



या कारवाईमध्ये वाशिम शहर व तालुक्यातील जयकिसन बाहेती, सुशिल ट्रेडर्स वाशिम, बालाप्रसाद मंत्री, प्रताप सूर्य, श्रीकृष्ण वानखेडे तसेच तेजमल दागडीया यांच्या ठिकाणी झडती घेण्यात आली.झडतीदरम्यान कथित सावकारी व्यवसायाशी संबंधित काही महत्त्वाचे दस्तऐवज पुढील चौकशीसाठी ताब्यात घेण्यात आले असून, संबंधित प्रकरणाची सखोल चौकशी सुरू आहे.

ही कारवाई जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर, पोलिस अधीक्षक निकेश खाटमोडे (पाटील) तसेच विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, अमरावती गौतम वर्धन यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, वाशिम गितेशचंद्र साबळे यांच्या नियंत्रणात पार पडली.कारवाईमध्ये सहायक निबंधक (प्रशासन) आर. आर. सावंत, सहायक निबंधक आय. एन. काबरा, सहायक निबंधक जी. आर. फाटे, सहायक निबंधक आर. व्ही. आकुलवार यांच्यासह सहकार, महसूल व पोलिस विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी सहभाग घेतला. यावेळी जिल्ह्यातील नागरिकांना आवाहन करण्यात आले आहे की, अवैध सावकारी व्यवहार करणाऱ्या व्यक्तींबाबतची माहिती अथवा तक्रार जिल्हा निबंधक (सावकारी) तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, वाशिम तसेच संबंधित तालुक्यातील तक्रारदाराची ओळख पूर्णपणे गोपनीय ठेवण्यात येईल, असे सहायक निबंधक (प्रशासन) आर. आर. सावंत यांनी कळविले आहे.

# मजुरी ते गृहमंत्री; आर.आर.आबांना घडवणाऱ्या योजनेला निरोप !

***अखेरचा सलाम 'मनरेगा २०* वर्षांच्या प्रवासाला पूर्णविराम * जी राम जी घेणार जागा, नवा कायदा देशभरात लागू**
***नव्या कायद्यांतर्गत देशात १०० ऐवजी मिळणार १२५ दिवसांचा रोजगार, तर शेतीसाठी ६० दिवसांची सुट्टी**

● दिपक मापारी @ कवठा ●

महाराष्ट्राच्या दुष्काळी परिस्थितीतून जन्मलेली आणि पुढे संपूर्ण देशाचा मुख्य आधार बनलेली 'महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना' (मनरेगा) आता इतिहासजमा होत आहे. १ जुलै २०२६ पासून ही योजना अधिकृतपणे निरोप घेत असून, तिची जागा आता 'विकसित भारत-रोजगार आणि आजीविका मिशन - ग्रामीण' (VB-G RAM G) अधिनियम, २०२५ घेणार आहे. ग्रामीण तरुणांना सन्मान आणि रोजगाराची हमी देणाऱ्या या मावळत्या योजनेला निरोप देताना, राज्याला एक शिस्तबद्ध गृहमंत्री देणाऱ्या स्व. आर. आर. पाटील (आबा) यांच्या आठवणींना आज प्रकर्षाने उजाळा मिळत आहे.

**आबा ईसीएस मजूर ते राज्याचे गृहमंत्री...**

मनरेगाची पूर्ववर्ती मानल्या जाणाऱ्या महाराष्ट्राच्या मूळ 'रोजगार हमी योजने'अंतर्गत कधीकाळी एका सामान्य तरुणाने प्रत्यक्ष मजूर म्हणून घाम गाळला होता. हाच तरुण पुढे स्वतःच्या कर्तृत्वाने आणि प्रामाणिकपणाने राज्याच्या गृहमंत्री पदावर पोहोचला- ते म्हणजे सर्वांचे लाडके आर. आर. पाटील (आबा). या योजनेने केवळ ग्रामीण हातांना काम दिले नाही, तर आबांसारखे एक जमिनीवर पाय असलेले कणखर नेतृत्व महाराष्ट्राला दिले. आबांच्या जडणघडणीत या योजनेचा मोठा वाटा होता.

**नवी ओळख, नवा चेहरा...**

ही योजना आता 'विकसित भारत-रोजगार आणि आजीविका मिशन - ग्रामीण' (VB-G RAM G) या नावाने ओळखली जाणार आहे. पूर्वीच्या लोगोमध्ये फावडे घेतलेला पुरुष, पाटी घेतलेली महिला आणि जल-भूमीचे प्रतीक होते. आता या योजनेचे




संपूर्ण रूप आधुनिक करण्यात आले असून, अंगमेहनतीसोबतच ग्रामीण भागात शाश्वत उपजीविकेची (आजीविका) साधने निर्माण करण्यावर भर दिला जाणार आहे.केंद्रात सत्तांतरे झाली, अनेक सरकारे आली, पण श्रमाला सन्मान मिळवून देणाऱ्या या योजनेचा गाभा कधीच बदलला नाही. अनेक दशके ग्रामीण अर्थव्यवस्थेला सावरणारी 'मनरेगा' आता नव्या विकसित भारतच्या वाटेवर चालण्यासाठी आपल्याला कायमचा निरोप देत आहे. या ऐतिहासिक योजनेला महाराष्ट्राच्या युवकांचा हा शेवटचा सलाम!

**काय आहे नवीन VB-G RAM G कायदा...**

२००५ साली आलेली मनरेगा योजना आताच्या बदलत्या ग्रामीण अर्थव्यवस्थेनुसार अद्ययावत करण्यासाठी हा नवीन कायदा आणला गेला आहे. यातील मुख्य बदल खालीलप्रमाणे आहेत: रोजगाराची हमी: पूर्वीच्या १०० दिवसांऐवजी आता एका कुटुंबाला वर्षाकाठी १२५ दिवसांच्या रोजगाराची हमी.

२. शेतीसाठी ६० दिवसांची सुट्टी:ङ पेरणी आणि कापणीच्या हंगामात शेतकऱ्यांना मजुरांची कमतरता भासू नये, यासाठी सलग ६० दिवस ही कामे बंद ठेवली जातील. हा काळ वगळून उर्वरित ३०५ दिवसांत १२५ दिवसांचे काम दिले जाईल. वेळेवर पगार आणि बेरोजगारी भत्ता: मजुरांना आठवड्याभरात किंवा जास्तीत जास्त पंधरा दिवसांत पगार दिला जाईल. तसेच काम न मिळाल्यास १५ दिवसांनंतर बेरोजगारी भत्ता देण्याची जबाबदारी राज्य सरकारवर असेल. विकासाचे चार मुख्य स्तंभ:ङ या योजनेअंतर्गत आता केवळ खड्डे खोदणे नाही, तर १) जल सुरक्षा, २) ग्रामीण पायाभूत सुविधा, ३) उपजीविकेची साधने आणि ४) हवामान बदलाचा सामना करण्यासाठी विशेष कामे केली जातील.

निधी आणि पारदर्शकता: ही योजना आता केंद्र आणि राज्याच्या ६०:४० या निधी वाटप सूत्रानुसार चालेल. तसेच 'पीएम गती शक्ती', 'जिओ-टॅगिंग' आणि 'बायोमेट्रिक' च्या माध्यमातून कामांमध्ये मोठी पारदर्शकता आणली जाईल.

### अपघातानंतर आर्थिक संकटात; वैद्यकीय सहाय्यता निधी ठरला आधार !

**१०० वर्षीय वृद्धेला अवघ्या २४ तासांत आर्थिक सहाय्य मंजूर**

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●




गंभीर अपघातामुळे उपचारासाठी आर्थिक अडचणीत सापडलेल्या १०० वर्षीय सरूबाई मुंजवार यांना मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधीतून अवघ्या २४ तासांत आर्थिक सहाय्य मंजूर करण्यात आले. या सहाय्यामुळे त्यांच्यावर आवश्यक शस्त्रक्रिया वेळेत पार पडून पुढील उपचार तातडीने सुरू करणे शक्य झाले.सरूबाई मुंजवार या रस्ता ओलांडत असताना भरधाव दुचाकीच्या धडकेत गंभीर जखमी झाल्या. या अपघातात त्यांच्या डाव्या मांडीला गंभीर दुखापत झाली. त्यानंतर त्यांना फलटण येथील खासगी रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. वैद्यकीय तपासणीनंतर डॉक्टरांनी तातडीने शस्त्रक्रिया करण्याचा सल्ला दिला. उपचारासाठी सुमारे सव्वा लाख रुपयांचा खर्च अपेक्षित असल्याने त्यांच्या कुटुंबासमोर आर्थिक अडचण निर्माण झाली. नातेवाईकांच्या माध्यमातून मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी योजनेची माहिती मिळाल्यानंतर रुग्णालयाच्या सहकार्याने २५ जून रोजी आर्थिक सहाय्यासाठी मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधीकडे अर्ज सादर करण्यात आला. अर्ज प्राप्त होताच मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी कक्षाने आवश्यक कागदपत्रांची पडताळणी करून प्रकरणावर तातडीने कार्यवाही केली. अवघ्या २४ तासांत आर्थिक सहाय्यास मंजुरी देण्यात आली.

सिटी न्यूज सुपरफास्ट बुलडाणा
शुक्रवार, दि. ३ जुलै २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

# हरणखेड येथे मुक्कामी बस फेरी सुरू करणे बाबत शिवसेनेच्या (उबाठा) मागणीला यश



प्रतिनिधी ३ जुलै

**१ जुलै २६ पासून मुक्कामी बस फेरी सुरू होणार आगार व्यवस्थापकांची शिवसेना पदाधिकाऱ्यांना माहिती...**

**मलकापुर :** तालुक्यातील हरणखेड व बोदवड तालुक्यातील हरणखेडे या दोन्ही गावाची लोकसंख्या आठ ते दहा हजार असून या रोडवर आळंद, जांबुळधावा, चिंचखेड, वडजी, माळेगांव ही गावे असून दळणवळणासाठी या गावातील ग्रामस्थांना, विद्यार्थ्यांना मलकापूर बाजारपेठेत ये-जा करावी लागते. सायंकाळी हरणखेड गावाला मुक्कामी बस फेरी सुरू केल्यास व पहाटे या मार्गावरून मलकापूर कडे येणाऱ्या प्रवासी- विद्यार्थ्यांची संख्या मोठ्या प्रमाणात असल्यामुळे सोयीस्कर होईल. तरी सायंकाळी मुक्कामी बस फेरी सुरू करण्याची मागणी शिवसेना उपजिल्हाप्रमुख गजानन ठोसर, उपतालुकाप्रमुख राजु नेवे, अमोल निकम सह आदिंनी दि. २५ जून २६ रोजी आगार व्यवस्थापक मुकुंद नाव्हकर यांच्याकडे केली होती.

आज दि.०१ जुलै २६ रोजी पासून हरणखेड येथे सायंकाळी मुक्कामी बस फेरी सुरू होणार असल्याची माहिती शिवसेना उपजिल्हाप्रमुख गजानन ठोसर, उपतालुकाप्रमुख राजु नेवे, अमोल निकम यांना आगार व्यवस्थापक मुकुंद नाव्हकर यांनी दिली. यावेळी शिवसेना उपशहर प्रमुख बाळू पोलाखरे, उपशहरप्रमुख शकील जमादार, नगरसेवक रफीकभाई बर्तनवाले, युवा सेना तालुकाप्रमुख पवन गरुड, युवा सेना शहरप्रमुख मंगेश सातव, शिवसेना उपतालुकाप्रमुख राजू नेवे, किसान सेना उपतालुकाप्रमुख विश्वनाथ पुरकर, विभागप्रमुख चॉद चव्हाण, विभागप्रमुख सत्तार शाह, शे. शब्बीर, गजानन बाम्हंदे, ज्ञानेश्वर इंगोले, विजय मुसळे, अमोल मुसळे, गजानन बाम्हंदे, गणेश बाम्हंदे, महादेव बाम्हंदे, राजेश घडेकर सह आदी उपस्थित होते.

# पेरणी झाल्यानंतर रानडुकरांचा शेतात धुमाकूळ!

**♦ तुरीच्या बियाण्यावर डल्ला, शेतकऱ्यांवर दुबार पेरणीचे संकट**

प्रतिनिधी ३ जुलै



**खामगाव :** तालुक्यातील महत्त्वाचे पीक असलेल्या तूर पिकांवर वन्यप्राणी विशेषकरून रानडुक्कर डल्ला मारत असल्याने नुकतेच पेरणी झालेल्या शेताचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहे. तासंच्या तासं हे रानडुकरे उकरून खात असल्यामुळे शेतकऱ्यांवर दुबार पेरणीचे संकट ओढवत आहे. यामुळे त्यांना आर्थिक फटका बसणार असल्याने शेतकरी वर्ग मेटाकुटीस आला आहे. तो रानडुकरांपासून आपले पीक वाचविण्यासाठी रात्र-दिवस शेतात राखणदारी करीत असल्याचे दिसून येत आहे.

तालुक्यात पावसाला सुरुवात होताच शेतकऱ्यांनी खरीप हंगामातील पेरणीची कामे वेगाने सुरू केली; मात्र पेरणीनंतर रानडुकरांच्या वाढत्या उपद्रवामुळे शेतकऱ्यांसमोर नवे संकट उभे ठाकले आहे. पेरणी केलेल्या शेतांमध्ये घुसून रानडुकरे तुरीच्या पेरलेल्या बियाण्यावर डल्ला मारत असल्याने अनेक शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर आर्थिक नुकसान होत आहे. खामगाव तालुक्यातील अनेक गावांमध्ये गेल्या काही दिवसांपासून रानडुकरांचा वावर वाढला आहे. रात्रीच्या वेळी कळपाने शेतात घुसून पेरलेली जमीन उकरत आहेत. विशेषतः तुरीची पेरणी झालेल्या शेतांमध्ये बियाणे खाण्यासाठी जमीन उकरल्याने पेरणी वाया जात आहे. त्यामुळे रानडुकरांच्या वाढत्या उपद्रवावर वन विभागाने तातडीने नियंत्रण मिळवावे, नुकसानग्रस्त शेतांचे त्वरित पंचनामे करून बाधित शेतकऱ्यांना नुकसानभरपाई जाहीर करून ती तातडीने वितरित करावी, अशी शेतकऱ्यांची प्रमुख मागणी आहे. दुबार पेरणीची वेळ येऊ शकते? अनेक शेतकऱ्यांवर दुबार पेरणी करण्याची वेळ येण्याची शक्यता निर्माण झाली आहे. रानडुकरांच्या उपद्रवामुळे केवळ बियाण्यांचेच नुकसान होत नसून शेताची मशागतही विस्कळीत होत आहे. परिणामी, शेतकऱ्यांच्या उत्पादन खर्चात वाढ होत असून, त्यांचा वेळ आणि श्रमही वाया जात आहेत. आधीच वाढत्या उत्पादन खर्चामुळे शेतकरी आर्थिक संकटात सापडला आहे. या संकटातून वन विभागाने शेतकऱ्यांना काढावे, अशी मागणी जोर धरत आहे.

### शेतकऱ्यांना शेतातच करावी लागते जागली

एरवी पीक डौलात आल्यानंतर शेतकऱ्यांना शेतात रखवाली करावी लागत असते. मात्र खामगाव तालुक्यातील अनेक शेतकऱ्यांना रानडुकरांच्या उपद्रवामुळे पेरणीपासूनच शेतात रात्र-दिवस रखवाली करण्याची वेळ आली आहे. हे रानडुकरे तुरीच्या पिकावर डल्ला मारत असून, रातोरात संपूर्ण शेतच उखरून खात असल्याने शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होत असून, त्यांच्यावर दुबार पेरणीची पाळी येत असल्याने आर्थिक फटका बसत आहे. त्यामुळे आपली पीक वाचविण्यासाठी भरपावसात ते शेतातच मुक्काम ठोकत असल्याचे चित्र तालुक्यात दिसून येत आहे.

# आता १८ ऐवजी केवळ चार झाडांवर कुऱ्हाड!

**♦ व्यावसायिकांच्या हरकतीनंतर खामगाव पालिकेचा निर्णय**

प्रतिनिधी ३ जुलै

**खामगाव :**

महात्मा गांधी उद्यान ते जगदंबा चौक रस्ता विकासकामासाठी सुरुवातीला १८ झाडे तोडण्याचा प्रस्ताव तयार करणाऱ्या खामगाव नगरपरिषद प्रशासनाने नागरिकांच्या हरकतीनंतर निर्णयात बदल केला आहे. सुनावणीनंतर पर्यायी आराखडा स्वीकारत आता केवळ चार झाडे तोडण्यास मंजुरी देण्यात आली असून, १४ झाडे वाचणार असल्याने पर्यावरणप्रेमी आणि स्थानिक व्यावसायिकांकडून या निर्णयाचे स्वागत होत आहे.

रस्ता विकासकामासह पाणीपुरवठा जलवाहिनीच्या स्थलांतरासाठी सुरुवातीला १८ झाडे तोडण्याचा प्रस्ताव नगरपरिषद प्रशासनाने तयार केला होता. याबाबत १० जून २०२६ रोजी संबंधित झाडांवर नोटीस लावण्यात आली होती; मात्र या निर्णयाला परिसरातील व्यावसायिकांनी तीव्र हरकत घेत, १५ जून रोजी मुख्याधिकाऱ्यांकडे निवेदन सादर केले. हरकतीची दखल घेत २६ जून रोजी सुनावणी घेण्यात आली. यावेळी कामासाठी उपलब्ध पर्यायांचा आढावा घेतल्यानंतर प्रशासनाने दिलासा देणारा निर्णय घेत १८ पैकी केवळ चार झाडे तोडण्यास मंजुरी दिली. तोडण्यात येणाऱ्या झाडांमध्ये एका व्यावसायिक दुकानासमोरील गुलमोहर, जगदंबा चौकाजवळील सप्तपर्णी, फायकस (शोभेचे झाड) आणि देशी बदाम या वृक्षांचा समावेश आहे.

# खामगाव विधानसभा मतदारसंघातील बीएलओंचे प्रशिक्षण संपन्न



प्रतिनिधी ३ जुलै

**खामगाव :** भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार खामगाव २६खामगाव विधानसभा मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (ँथ्ध) यांचे प्रशिक्षण मा. मतदान नोंदणी अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आले.

प्रशिक्षणामध्ये बीएलओ यांना मतदार यादी विशेष पुनरीक्षण कार्यक्रमांतर्गत करावयाची कार्यपद्धती, मतदार नोंदणी, नाव समाविष्ट करणे, वगळणे, दुरुस्ती करणे, तसेच घरभेटीद्वारे माहिती संकलन आणि निवडणूक आयोगाच्या निर्देशांचे प्रभावीपणे पालन करण्याबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. यावेळी उपस्थित बीएलओंना आवश्यक असलेल्या ईं व ँथ्ध किटचे वितरण करण्यात आले. प्रशिक्षणाद्वारे बीएलओंना त्यांची जबाबदारी प्रभावीपणे पार पाडण्यासाी आवश्यक सूचना व मार्गदर्शन देण्यात आले.

# 0 ते 18 वयोगटातील मुलांसाठी मोफत हृदयरोग तपासणी शिबिराचे आयोजन

प्रतिनिधी ३ जुलै

**नांदुरा:** किम्स हॉस्पिटल व भारतीय जनता पार्टी नांदुरा शहर व तालुका यांच्या संयुक्त विद्यमाने ०ते १८ वयोगटातील मुले मुलीं करिता मोफत हृदयरोग तपासणी व उपचार शिबिराचे ५जुलै २०२६ रवीवार रोजी सकाळी १०ते दुपारी २

या वेळेत छत्रपती शिवाजी महाराज चौकातील नगरपरिषद टाऊन हॉल येथे आयोजन करण्यात येणार आहे कार्यक्रमाचे उद्घाटक म्हणून मलकापूर विधानसभा मतदारसंघाचे आमदार मा श्री चैनसुखजी संचेती हे राहणार असून नगराध्यक्षा सौ मंगलाताई सुधीर मुऱ्हेकर, उपनगराध्यक्षा सौ माधुरीताई प्रमोद खोंड व भाजपा ज्येष्ठ नेते सुधीरभाऊ मुऱ्हेकर यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे

तर सुप्रसिद्ध डॉ श्रीनिवास एल चिफ अँड सीनियर कन्सल्टंट इंटरव्हेंशनल पेडियाट्रिक कार्डिओलॉजिस्ट व डॉ सोनिया कारापूरकर कन्सल्टंट पेडियाट्रिक अँड फेटल कार्डिओलॉजिस्ट हे टु डी इको मशीन द्वारे बालकांची तपासणी करून पुढील उपचाराकरिता योग्य मार्गदर्शन करणार आहेत यापूर्वी नोव्हेंबर २०२५ ला मलकापूर येथे पार पडलेल्या लहान मुलांच्या मोफत हृदयरोग तपासणी शिबिरातील ४० मुलांवर यशस्वीरीत्या शस्त्रक्रिया पार पडलेल्या आहेत

# सिल्वरसिटी मल्टिस्पेसिलिटी हॉस्पिटल मध्ये डॉक्टर्स डे उत्साहात साजरा

**'सिल्वरसिटी जीवनगौरव पुरस्काराचे वितरण..'**

प्रतिनिधी ३ जुलै

**खामगांव :** सिल्वरसिटी मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल, क्रिटिकल केअर व ट्रामा सेंटर, जलंब रोड, खामगाव येथे आज दि १ जुलै रोजी राष्ट्रीय डॉक्टर डे मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या प्रसंगी मंच्यावर सिल्वरसिटी हॉस्पिटल चे अध्यक्ष डॉ अशोक बावस्कर, व्यवस्थापकीय संचालक डॉ पंकज मंत्री, मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ पराग महाजन, संचालक डॉ प्रशांत कावडकर, डॉ निलेश तिबडेवाल, डॉ भगतसिंग राजपूत, डॉ गौरव गोयंका, डॉ आनंद राठी, भागधारक डॉ राजेंद्र गोठी, डॉ गुरुप्रसाद थेटे, डॉ गिरीश पवार, डॉ ब्रह्मानंद टाले, सत्कार मूर्ती प्रसिद्ध प्रस्तुती व स्त्रीरोगतज्ज्ञ डॉ रमेश काळपांडे व डॉ सौ मंगला काळपांडे यांची सहपरिवार उपस्थिती होती. कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांचे हस्ते द्विप प्रज्वलन व धंवन्तरी पुजानाने करण्यात आली. व्यवस्थापकीय संचालक डॉ पंकज मंत्री यांनी कार्यक्रमाचे प्रस्तविक केले. डॉक्टर डे चे औचित्य साधून सिल्वरसिटी हॉस्पिटल खामगाव चे भागधारक जळगाव जामोद येथील सुप्रसिद्ध प्रसूती व स्त्रीरोगतज्ज्ञ डॉ रमेश काळपांडे यांचा शाल, श्रीफळ, हार व सिल्वरसिटी जीवनगौरव पुरस्कार स्मृती चिन्ह देऊन सपत्नीक सत्कार हॉस्पिटलचे अध्यक्ष डॉ अशोक बावस्कर व इतर सर्व मान्यवराचे हस्ते करण्यात आला. सत्कार मूर्ती चा परिचय मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ पराग महाजन यांनी दिला. तदनंतर हॉस्पिटल चे सर्व संचालक वृंद, भाग धारक डाक्टर्स, हॉस्पिटल मध्ये कार्यरत सर्व डॉक्टर्स यांचा गुलाब पुष्प व भेट वस्तू देऊन डॉक्टर्स डे निमित्त सत्कार करण्यात आला.. सत्कारास उत्तर देतांना डॉ रमेश काळपांडे यांनी आपल्या खडतर प्रवासची माहिती दिली व सिल्वरसिटी हॉस्पिटल ने दिलेल्या पुरस्काराने भारावून गेल्याचे सांगितले.

आपल्या अध्यक्षीय भाषणात डॉ अशोक बावस्कर यांनी डॉक्टर्स डे चे महत्व व भारतरत्न डॉ भिधान चंद्र रे यांच्या बद्दल माहिती दिली..

संचालक डॉ आनंद राठी यांन्री उपस्थितीतांचे आभार मानले. या कार्यक्रमा सोबतच हॉस्पिटल मधील उत्कृष्ट कार्य करणाऱ्या डॉ जुनेद, डॉ पंकज, डॉ अजय व डॉ श्रुती काळे या निवासी डॉक्टरांचा प्रशस्तिपत्र व अवॉर्ड देऊन गौरव करण्यात आला. कार्यक्रमाचे संचलन संचालक डॉ गौरव गोएंका यांनी केले. या कार्यक्रमांस डॉ सुरेश शिरसाट, डॉ दिपाली सुरूशे, डॉ रविन्द्र वराडे, डॉ छाजेड, डॉ विमल दुगड, डॉ सौ वैशाली चरखा, डॉ सौ अपर्णा बावस्कर, डॉ सौ दीपा मंत्री, डॉ सौ रुपाली महाजन, डॉ सौ मंजुश्री तिबडेवाल, डॉ सौ मंजुषा महाले, डॉ सौ उज्ज्वला पवार, डॉ आयन हुसेन, डॉ सौ पूजा तेरेदेसाई व इतर सर्व डॉक्टर्स मंडळीची सहकुटुंब उपस्थिती होती तसेच हॉस्पिटल चे सर्व कर्मचारी वृंद उपस्थित होते.. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी हॉस्पिटल चे सुपरवाईजर श्री राजेश साटोटे, सुपरवाईजर अभिषेक, ऑफिस स्टाफ सौ विद्या रिसेप्शनिस्ट सौ जया इंगळे तसेच सर्व कर्मचाऱ्यांचे सहकार्य लाभले असे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ पराग महाजन यांनी एका प्रसिद्धी पत्रकाद्वारे कळविले आहे..

# क्षुल्लक कारणावरून शेजाऱ्यांमध्ये हाणामारी

**♦ शिवाजीनगर पोलिसात परस्परविरोधी गुन्हा दाखल**

प्रतिनिधी ३ जुलै

**खामगाव :** शहरातील दाळ फैल परिसरात क्षुल्लक कारणावरून शेजाऱ्यांमध्ये झालेल्या वादाचे पर्यवसान हाणामारीत झाले. या घटनेत दोन्ही गटांतील काहीजण जखमी झाले असून, दोन्ही बाजूंनी एकमेकांविरुद्ध दिलेल्या तक्रारींवरून शिवाजीनगर पोलिस ठाण्यात परस्परविरोधी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तक्रारीनुसार, हजराबी बशीरखान (४५, रा. दाळफैल, खामगाव) यांनी

दिलेल्या फिर्यादीनुसार, ३० जून रोजी रात्री सुमारे १०:४५ वाजता खाटू श्याम मंदिराजवळील नाल्याच्या पुलावर त्यांचा मुलगा अरबाज व शेख जावेद यांच्यात शाब्दिक वाद झाला. हा वाद वाढताच शेख जावेद याने काठीने अरबाजच्या डोक्यावर वार करून त्याला जखमी केल्याचा आरोप फिर्यादीने केला आहे. त्यानंतर आरोपींसह अन्य काहीजण फिर्यादीच्या घरासमोर येऊन शिवीगाळ करू लागले. वाद मिटविण्याचा प्रयत्न करणाऱ्या हजराबी बशीरखान यांच्यासह त्यांचे मुले अरबाज व जाबाज यांना मारहाण करण्यात आल्याचे फिर्यादीत नमूद आहे. दरम्यान, दुसऱ्या प्रकरणात शमीना परवीन शेख शकील (४३, रा. फाटकपुरा, दाळफैल, खामगाव) यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, त्यांचा मुलगा जावेद व सोहेल खान यांच्यात गल्लीत झालेल्या वादानंतर सोहेल खान व त्याच्या साथीदारांनी त्यांच्या घरासमोर येऊन शिवीगाळ केली. जाब विचारण्यासाठी बाहेर आलेल्या फिर्यादी व त्यांची नणंद शाहेस्ता परवीन यांच्यावर आरोपींपैकी एकाने दगड फेकून शाहेस्ता यांच्या कपाळावर मारल्याचा, तसेच दोघींना मारहाण केल्याचा आरोप करण्यात आला आहे. यावेळी जीवे मारण्याची धमकी दिल्याचाही उल्लेख तक्रारीत करण्यात आला आहे. या प्रकरणाचा तपास सहायक पोलिस उपनिरीक्षक रामसिंग राजपूत करीत आहेत.

# पाण्यावरून वाद; माय-लेकावर चाकूने हल्ला!

प्रतिनिधी ३ जुलै

**मलकापूर :** नालीच्या पाण्याच्या कारणावरून झालेल्या वादातून एक ५८ वर्षीय महिला आणि तिच्या मुलाला मारहाण केल्याची घटना मलकापूर तालुक्यातील घिर्णी येथे घडली. याप्रकरणी ३० जून रोजी रात्री मलकापूर शहर पोलिसांनी एकाच कुटुंबातील पाच जणांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी नलूबाई श्रीराम वाघमारे (रा.घिर्णी) यांच्या घरासमोरील नाली बुजवून पाणी रस्त्यावर सोडल्यामुळे गेल्या काही महिन्यांपासून वाद सुरू होता. ७ मे रोजी सकाळी याच कारणावरून संशयित आरोपी विनोद लक्ष्मण वाघमारे, यशोदा लक्ष्मण वाघमारे आणि लक्ष्मण निनाजी वाघमारे यांनी फिर्यादीशी वाद घालून त्यांना व त्यांच्या मुलाला मारहाण केल्याचा आरोप आहे. फिर्यादीनुसार, मारहाणीपासून बचाव करण्यासाठी दोघेही घरात गेल्यानंतर आरोपी त्यांच्या घरात घुसले. त्यावेळी लक्ष्मण वाघमारे यांनी नलूबाई वाघमारे यांच्यावर चाकूने वार करून जखमी केले, तर विनोद वाघमारे यांनी त्यांच्या मुलाच्या पायावर चाकूने वार केल्याचा आरोप फिर्यादीने केला आहे. यशोदा वाघमारे यांनीही मारहाण केल्याचे तक्रारीत नमूद आहे. तसेच आरोपींकडून सातत्याने त्रास दिला जात असल्याचा आणि धमक्या दिल्याचाही आरोप फिर्यादीने केला आहे. या संदर्भात वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांकडे तक्रार केल्यानंतर मलकापूर शहर पोलिसांनी गुन्हा नोंदवला. याप्रकरणी विनोद लक्ष्मण वाघमारे, यशोदा लक्ष्मण वाघमारे, लक्ष्मण निनाजी वाघमारे, सरला विनोद वाघमारे आणि संजय लक्ष्मण वाघमारे यांच्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम ११८(१) व २९६ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास पोलिस करत आहेत.

# विठ्ठलनामाच्या गजरात श्री संत सखाराम महाराज पालखीचे पंढरपूरकडे प्रस्थान!

**♦ वऱ्हाडातील १३९ वर्षांची परंपरा जपणारी जुनी पालखी**

प्रतिनिधी ३ जुलै

**जळगाव जामोद :** विठ्ठलनामाच्या अखंड गजरात, टाळ-मृदंगाच्या निनादात आणि भगव्या पताकांच्या साक्षीने वऱ्हाडातील सर्वात जुनी, १३९ वर्षांची परंपरा लाभलेल्या श्रीसंत सखाराम महाराजांच्या पालखीचे बुधवारी श्रीक्षेत्र पंढरपूरकडे राजवैभवी थाटात प्रस्थान झाले. श्रीसंत सखाराम महाराज संस्थानचे अध्यक्ष हभप तुकाराम महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली पालखी मार्गस्थ झाली. यावेळी कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती प्रसेनजित पाटील, भाजप जिल्हाध्यक्ष सचिन देशमुख, शेगावचे माजी नगराध्यक्ष शैलेंद्र पाटील, शिवसेनेचे शांताराम दाणे, संस्थानचे व्यवस्थापक श्रीकृष्ण पाटील, संजय खोंड खोद्री व विलासबापू देशमुख यांच्यासह भाविक उपस्थित होते.

**२०० वारकऱ्यांचा सहभाग**

१५ ते ७५ वर्षे वयोगटातील सुमारे २०० वारकरी दिंडीत सहभागी झाले आहेत. प्रारंभी हभप तुकाराम महाराज, प्रसेनजित पाटील, सचिन देशमुख, शांताराम दाणे व श्रीकृष्ण पाटील यांनी पादुकांचे पूजन केले. हभप मुकुंदा महाराज दिंडी प्रमुख, तर हभप एकनाथ डिक्कर विणेकरी म्हणून जबाबदारी सांभाळत आहेत.

**असा राहणार पालखीचा पायी प्रवास**

पालखी भास्तन, माटरगाव, मात्ता, खामगाव, अंत्रज, हिवरखेड, गणेशपूर, उंद्री, टाकरखेड, दिवठाणा, चिखली, रामनगर, वाकी, टाकरखेडा, कुंभारी, वाघरूळ, जामवाडी, जालना, मठ पिंपळगाव, लालवाडी, रामनगर तांडा, शहापूर, महाकाळ, नागझरी, गेवराई, पांडळशिंगी, पेडगाव, बीड, पाली, मोरगाव, चौसाळा, पिंपळगाव, ईजोरा, वाकवड, भूम, देवळाली, ताडसोंदणे मार्गे २३ जुलै रोजी पंढरपूर येथे पोहोचणार आहे.

**महिलांसह शेकडो भाविकांची पायीवारी**

भेंडवळ बसस्थानकापर्यंत शेकडो भाविकांनी पालखीसोबत पायीवारी केली. भेंडवळ येथे विठ्ठलराव अवचार यांनी वारकरी व भाविकांसाठी अल्पोपाहार व चहाची व्यवस्था केली.

# मोहरमच्या सुट्टीत बंद घरातून रोकड, दागिने लंपास

प्रतिनिधी ३ जुलै

**नांदुरा :** मोहरमच्या सलग सुट्ट्यांमध्ये कुटुंब बाहेरगावी गेल्याची संधी साधत अज्ञात चोरट्याने नांदुरा शहरातील गणपतीनगर परिसरातील एका बंद घरात घरफोडी करून रोकड व चांदीचे दागिने असा सुमारे आठ हजार रुपयांचा ऐवज लंपास केला. ही घटना २८ जून रोजी रात्री घडली. या प्रकरणी ३० जून रोजी गुन्हा दाखल करण्यात आला. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी जीवन नथुराम कदम (३०) हे नांदुरा येथील आयटीआय महाविद्यालयात भंडारपाल म्हणून कार्यरत आहेत. मोहरमच्या सुट्टीनिमित्त ते २५ जून रोजी कुटुंबासह सातारा जिल्ह्यातील त्यांच्या मूळ गावी गेले होते. दरम्यान, २८ जून रोजी मध्यरात्री त्यांच्या घराच्या दिशेने मोठा आवाज झाल्याने शेजारी मोहन कुटे यांनी पाहणी केली असता, घराचा मुख्य दरवाजा उघडा असल्याचे दिसून आले. त्यांनी तातडीने कदम यांना दूरध्वनीवरून माहिती दिली. कदम हे २९ जून रोजी घरी परतल्यानंतर घरातील सामान अस्ताव्यस्त पडलेले दिसले, तसेच कपाटातील सात हजार रुपयांची रोकड आणि सुमारे एक तोळा वजनाचे जुने चांदीचे पैंजण (अंदाजे किंमत एक हजार रुपये) चोरीस गेल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. एकूण आठ हजार रुपयांचा ऐवज चोरीस गेला आहे.

# एटीएम कार्ड बदलून ग्रामसेविकेची 70 हजार रुपयांची फसवणूक!

**♦ मलकापुरातील प्रकार; दोन अज्ञाताविरुद्ध गुन्हा दाखल**

प्रतिनिधी ३ जुलै

**मलकापूर :** एटीएममधून पैसे काढण्यासाठी गेलेल्या ग्रामसेविकेचे एटीएम कार्ड हातचलाखीने बदलून त्यांच्या बँक खात्यातून ७० हजार रुपये काढल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणी ३० जून रोजी मलकापूर शहर पोलिसांनी दोन अज्ञात व्यक्तींविरुद्ध फसवणुकीचा गुन्हा दाखल केला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, अर्चना रामराव माहुरे (३०, रा. रामवाडी, मलकापूर) या दुधलगाव येथे ग्रामसेविका म्हणून कार्यरत आहेत. २९ जून रोजी सायंकाळी त्या मलकापूर येथील स्टेट बँक ऑफ इंडिया शाखेच्या एटीएममध्ये पैसे काढण्यासाठी गेल्या होत्या. व्यवहार पूर्ण झाल्यानंतर तेथे उपस्थित असलेल्या दोन अनोळखी व्यक्तींनी त्यांना व्यवहार पूर्ण झालेला नसल्याचे सांगून पुन्हा एटीएम कार्ड मशीनमध्ये टाकण्यास सांगितले. त्यानंतर हातचलाखीने त्यांचे एटीएम कार्ड बदलल्याचा आरोप फिर्यादीने केला आहे.

दुसऱ्या दिवशी त्यांच्या मोबाइलवर खात्यातून रक्कम वजा झाल्याचे संदेश आल्यानंतर त्यांनी खात्याची पडताळणी केली असता, २९ जूनच्या सायंकाळपासून ३० जूनच्या सकाळपर्यंत मुक्ताईनगर आणि बऱ्हाणपूर येथील एटीएममधून सात व्यवहारांद्वारे प्रत्येकी १० हजार रुपये, असे एकूण ७० हजार रुपये काढण्यात आल्याचे निदर्शनास आले. या प्रकरणी अर्चना माहुरे यांच्या तक्रारीवरून मलकापूर शहर पोलिसांनी दोन अज्ञात आरोपींविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम ३१८(२) व ३(५) अन्वये गुन्हा दाखल केला असून, पुढील तपास पोलिस उपनिरीक्षक प्रशांत झेडगे करीत आहेत.

सिटी न्यूज सुपरफास्ट वऱ्हाड
८
शुक्रवार, दि. ३ जुलै २०२६ Web. http://epaper:citynewssuperfast.com



# स्वच्छतेवर लाखो रुपये खर्च, तरीही नाले तुंबलेले

## आरपीटीएस रोडवरील नाला कचऱ्याने भरलेला

प्रतिनिधी दि. ३ जुलै

**अकोला:** शहर स्वच्छतेवर महापालिका लाखो रुपये खर्च करते. पण तरीही नाले कच-याने भरलेले दिसतात. याविषयी प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे. आरपीटीएस रोडवरील नाला अक्षरश: कचराकुंडी बनला आहे.

शहरातील नाले, नाल्यांची सफाई कशाप्रकारे झाली हे दिसून येते. मोठ्या नाल्यांची स्वच्छता नीट झाली नाही. खरेतर झोननिहाय स्वच्छता कामाचा आढावा घेण्याची आवश्यकता आहे. ज्या ठिकाणी अजूनही लक्ष दिले गेले नाही.

तेथील स्वच्छता कामे प्राधान्याने होणे आवश्यक आहे. कारण अजूनही या भागात म्हणावा तसा पाऊस नाही.

अजूनही वेळ गेली नाही असा सारासार विचार करून नाल्यांची स्वच्छता करण्यात यावी. नाही तर पुढे नाल्यातील पाणी रस्त्यावर येऊन समस्या गंभीर स्वरूप प्राप्त करू शकतात. महापालिका यंत्रणा या बाबतीत सजगता दाखवेल का अशी विचारणा स्थानिक रहिवासी करीत आहेत.

# घरकुलाची जागा केंद्रीय विद्यालयासाठी

## गट क्रमांक १३३ मधील जागा तर घरकुलासाठी, गुडधी येथे केंद्रिय विद्यालय होणार की नाही ?

प्रतिनिधी दि. ३ जुलै



अकोल्यात केंद्रिय विद्यालयासाठी देण्यात आलेल्या गुडधी येथील गट क्रमांक १३३ च्या जागेचा वाद समोर आला आहे. स्थानिक गुडधी येथील रहिवाशांनी ही जागा घरकुलासाठी दिल्याचे कागदपत्रे समोर केल्याने गुडधी येथे केंद्रिय विद्यालय होईल की नाही या विषयी शंकांना बळ मिळाले आहे. स्थानिकांचे कागदपत्रे आणि दावे पाहता केंद्रिय विद्यालयाच्या मार्गातील अडथळे संपता संपेना असे चित्र निर्माण झाले आहे.

राज्य सरकारने मौजे गुडधी येथील गट क्रमांक १३३ अ/ब/क मधील २.०२ हेक्टर जागा महसूल मुक्त आणि विनामूल्य कब्जेहक्काने प्रदान करण्यास मंजुरी दिली आहे. जिल्हाधिकाऱ्यांनी या जागेचा आगाऊ ताबा देण्याचे आदेश निर्गमित केल्यामुळे केंद्रिय विद्यालय स्थापन होण्याची शक्यता वाढली. पण, असे असताना या जागेवर तर स्थानिकांना घरकुलासाठी १९९३-१९९४ मध्ये तहसिलदारांनी आदेशित केले होते.

पण,गट क्रमांक १३३ मधील कोणती जागा कोणाची याचे मार्विंâग स्थानिकांनी प्रशासनाला मागितले होते. पण, ते मार्विंâग प्रशासनाने, भूमी अभिलेख विभागाने करुन दिले नाही. असा आरोप गुडधीवासियांनी केला आहे. गट क्रमांक १३३ आणि १३६ मध्ये १२७ लोकांनी त्यांच्या भुखंडासाठीचे पैसे शासनाकडे भरले आहे. असे असताना १३३ अ, ब आणि क मधील २ हेक्टर जागा ही केंद्रिय विद्यालयासाठी दिल्याची गोष्ट स्थानिकांच्या जिव्हारी लागली आहे.



आगरकर विद्यालय

## आगरकर शाळेवर केलेल्या कोट्यावधीच्या खर्चाचे काय ?



टाऊन हायस्कूल

» गुडधी येथील केंद्रीय विद्यालयाची नवीन इमारत पूर्ण होईपर्यंत शाळा तात्पुरत्या स्वरूपात सुरू करण्यासाठी हरिहर पेठ येथील जिल्हा परिषद माध्यमिक शाळा शहर अर्थात टाऊन शाळेचे दूरुस्ती करण्यात येणार आहे. पण, तत्पुर्वी आगरकर शाळेत केंद्रिय विद्यालयाच्या तात्पुरत्या स्थापनेसाठी झालेल्या खर्चास कोण जबाबदार असा प्रश्न उपस्थित होत आहे.केंद्रिय विद्यालय सुरु करण्यासाठी हरिहरपेठ येथे प्राथमिक स्तरावर शाळा सुरू करण्याची तयारी जिल्हा प्रशासनाने सुरु केली आहे. हरिहर पेठेतील या इमारतीमध्ये सार्वजनिक बांधकाम विभागाच्या वतीने तातडीने दुरुस्तीची कामे हाती घेतली जाणार आहेत. यामध्ये छताचे टीन बदलणे, खोल्यांची रंगरंगोटी, स्लॅब गळती बंद करणे, मुले व मुलींसाठी स्वच्छतागृहांची दुरुस्ती, पाण्याची सोय आणि इलेक्ट्रिक जोडणी या कामांचा समावेश आहे. अकोला जिल्हाधिकाऱ्यांनी जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना १ महिन्याच्या आत ही सर्व दुरुस्तीची कामे पूर्ण करून इमारत केंद्रीय विद्यालयाकडे सुपूर्द करण्याचे आदेश दिले आहेत. टाऊन हायस्कुल येथे काम होत आहे ही चांगली गोष्ट आहे. पण, काही वर्षांपुर्वी आगरकर शाळेत केलेल्या कोट्यावधीच्या कामाचे काय, आगरकर शाळेत देकील केंद्रिय विद्यालय स्थापन करण्याची तयारी होती. तिथे देखील कामकाज केले गेले. या विषयी जिल्हा परिषदेच्या बांधकाम विभागाने शिक्षण विभागाकडे आज आमच्या प्रतिनिधीला बोट दाखविले. तर दोन्ही विभागाने कुठलीही माहिती दिली नाही.

# अकोला मुद्रांक जिल्हाधिकाऱ्यांच्या घर झडतीत सापडले मोठे घबाड!

## रोकड, दागिन्यांसह ३ कोटींचा मुद्देमाल जप्त

प्रतिनिधी दि. ३ जुलै

**अकोला :** येथील सह जिल्हा निबंधक तथा मुद्रांक जिल्हाधिकारी, वर्ग-१, अकोला किरण पुरूषोत्तम चौधरी यांच्या जळगाव खान्देश येथील विष्णुनगर निवासस्थानाची झडती घेतली असता मोठे घबाड सापडले आहे. यावेळी रोकडे, सोन्या-चांदीचे दागिने व इतर मौल्यवान वस्तू असा २ कोटी ९४ लाखांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. यामुळे सर्वांचे डोके चक्रावले आहे.

मुद्रांक जिल्हाधिकारी किरण चौधरी यांच्या जळगाव येथील विष्णुनगरमधील राहते घराची झडती करण्याकरिता लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अकोला कडून अधिकारपत्र प्राप्त झाले होते. नमूद घराची झडती करिता २५ जून २०२६ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,जळगाव कडील पथक गेले असता सदर घर बंद अवस्थेत मिळून आल्याने ते पंचांसमक्ष सिलबंद करण्यात आलेले होते.

दरम्यानच्या काळात २७ जून २०२६ रोजी किरण चौधरी यांचे नातेवाईक यांनी नमूद सिलबंद असलेले घराचे मागील गॅलरीचे व घराचे दरवाजाचे कुलूप तोडून घरफोडी करण्याच्या व पुरावे नष्ट करण्याचे उद्देशाने आत प्रवेश केला होता. तेव्हा त्यांना रंगेहाथ पकडण्यात आले होते. त्याबाबत जिल्हापेठ पो स्टे येथे गुरन २०७/२०२६ बी.एन.एस २०२३ चे कलम ३०५ (ब), ३३१ (२), २३८, ६२ प्रमाणे गुन्हा दाखल आहे. २ एप्रिल २०२६ रोजी आलोसे किरण चौधरी यांची पत्नी मनीषा किरण चौधरी व त्यांचे नातेवाईक, दोन शासकीय पंच, गोल्ड व्हॅल्यूअर, बँक कॅशियर यांचे समक्ष राहते घराची झडती घेण्यात आली. यावेळी १ कोटी ५३ लाख ८४, ६३० रूपयांची रोकड, ६० लाख ५७ हजार १३५ रुपये किमतीचे ४२२.१०० ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने व दोन बिस्किट्स यासह ११ लाख ५२ हजार ७४५ रुपये सोने खरेदी केल्याच्या पावत्या, ३१ हजार ४१६ रू किंमतीचे १५४.१०० ग्रॅम चांदीचे दागिने, तसेच ६२ लाख १३ हजार ३७६ रुपये किं. चे वेगवेगळ्या ठिकाणी त्यांचे व कुटुंबातील सदस्यांचे नावे प्रॉपर्टी असल्याचे खरेदीखत, बक्षिसपत्रे इ. कागदपत्रे, ६ लाख २५ हजार ५४५ रूपये घरातील वस्तूंची किमंत, असा एकूण २ कोटी ९४ लाख ६४ हजार ८४७ रूपये किमतीचा ऐवज जप्त करण्यात आला आहे.

# पेरणी सुरु..आता नजरा आभाळाकडे !

प्रतिनिधी दि. ३ जुलै



**अकोला :** राज्यात अनेक भागांत शेतकऱ्यांनी खरीप हंगामातील पेरणीला वेग दिला आहे. अकोला जिल्ह्यातील शेतकरी देखील कापूस, सोयाबीन, तूर, मका यासह विविध पिकांची पेरणी मोठ्या प्रमाणावर सुरू आहे. मात्र पेरणी झाल्यानंतर अपेक्षित पाऊस न झाल्याने शेतकऱ्यांची चिंता वाढली आहे. उगवण चांगली होण्यासाठी आता दमदार आणि सातत्यपूर्ण पावसाची गरज असून बळीराजा आभाळाकडे डोळे लावून बसला आहे. खरीप हंगामाला सुरुवात होताच शेतकऱ्यांनी शेतातील मशागतीची कामे पूर्ण करून मोठ्या आशेने पेरणी सुरू केली आहे. अनेक ठिकाणी कापूस, सोयाबीन, तूर, मका आणि इतर पिकांची पेरणी अंतिम टप्प्यात असून काही भागात ती पूर्णही झाली आहे. मात्र पेरणीनंतर समाधानकारक पाऊस न झाल्याने शेतकऱ्यांची चिंता वाढली आहे. बियाण्यांची योग्य उगवण होण्यासाठी जमिनीत पुरेसा ओलावा आवश्यक असतो. पण पावसाने ओढ दिल्यास बियाणे जमिनीतच पडून राहण्याची किंवा उगवण कमी होण्याची शक्यता निर्माण होते.यंदा बियाणे, खते, औषधे आणि मशागतीचा खर्च मोठ्या प्रमाणात वाढला आहे. त्यामुळे पेरणीसाठी मोठी गुंतवणूक केलेल्या शेतकऱ्यांच्या आशा आता पूर्णपणे पावसावर अवलंबून आहेत. वेळेत पाऊस न झाल्यास उत्पादनावर परिणाम होऊन आर्थिक नुकसान सहन करावे लागू शकते. सध्या संपूर्ण शेतकरी वर्गाची नजर आभाळाकडे लागली असून येत्या काही दिवसांत दमदार आणि सातत्यपूर्ण पाऊस पडावा, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. वेळेत पाऊस झाल्यास पिकांची उगवण चांगली होऊन खरीप हंगामाला दिलासा मिळेल, अशी आशा बळीराजा व्यक्त करत आहे.

# आर.डी.जी. स्कूलमध्ये अत्याधुनिक विज्ञान प्रयोगशाळेचे उद्घाटन

## विद्यार्थ्यांच्या वैज्ञानिक मॉडेलसाठी सर्जनशील उपक्रमांनी सर्वांना केले प्रभावित

प्रतिनिधी दि. ३ जुलै



**अकोला:** आर.डी.जी. पब्लिक स्कूलमध्ये १ जुलै रोजी विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन आणि संशोधनाची आवड निर्माण करण्याच्या उद्देशाने अत्याधुनिक विज्ञान प्रयोगशाळेचे भव्य उद्घाटन उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाले. अतिशय सुंदर आयोजनाने उपस्थित मान्यवर भारावले.

कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून भारतीय सेवा सदनचे उपाध्यक्ष श्री भरत गोयनका, आर्किटेक्ट श्री अनिल अग्रवाल आणि श्री सुनील अग्रवाल उपस्थित होते. तसेच शाळेचे संचालक श्री दिलीपराज गोयनका, श्री सौरभ गोयनका, प्राचार्य कुरियचन सी.पी., उपप्राचार्या श्वेता चोमवाल तसेच भारतीय सेवा सदनच्या सदस्या इंदुबाला चौधरी यांची विशेष उपस्थिती लाभली. कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते फित कापून विज्ञान प्रयोगशाळेचे उद्घाटन करून करण्यात आली. त्यानंतर उपस्थित मान्यवरांचे रोप आणि पुस्तक देऊन स्वागत करण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांनी स्वतः तयार केलेल्या विविध वैज्ञानिक मॉडेल्सचे आकर्षक सादरीकरण केले. यामध्ये पंपकिन मॉडेल, प्रतिमा बोध, गुरुत्वाकर्षणाचे महत्त्व, डीएनए मॉडेल, प्राणी पेशी, आणि रदरफोर्ड मॉडेल हे विशेष आकर्षण ठरले. विद्यार्थ्यांनी या मॉडेल्सची कार्यपद्धती आणि वैज्ञानिक महत्त्व यांची सविस्तर माहिती देत आपली प्रतिभा आणि वैज्ञानिक विचारसरणीचे दर्शन घडविले. कार्यक्रमात आयोजित ब्रश पेंटिंग उपक्रमानेही सर्वांचे लक्ष वेधून घेतले. विद्यार्थ्यांनी आपल्या सर्जनशीलता आणि कलात्मक कौशल्याचे उत्कृष्ट प्रदर्शन केले. ज्याचे उपस्थित मान्यवरांनी कौतुक केले. यावेळी श्री दिलीपराज गोयंका, श्री भरत गोयंका आणि श्री सौरभ गोयंका यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विद्यार्थिनी अंशिता मिश्रा आणि देवश्री गोमांसे यांनी केले. विज्ञान विभागप्रमुख दुर्गा पाठक यांनी आभार प्रदर्शन केले. विज्ञान प्रयोगशाळेच्या यशस्वी आयोजनासाठी विभागप्रमुख दुर्गा पाठक, शिक्षिका मीनल कडू, श्रद्धा गिरी, जय पाटणे, सोनल पसारी, प्राजंली देशमुख, मंदार जोशी आणि रीना गुप्ता यांचे विशेष सहकार्य लाभले.

# दुर्मिळ ‘इंडियन पेंटेड फ्रॉग’चे दर्शन

प्रतिनिधी ३ जुलै

**उमरखेड:** नांदेड शहरातील एका निवासी भागात दुर्मिळ ‘इंडियन पेंटेड फ्रॉग’ (युपेरोडॉन टॅप्रोबॅनिकस) या वैशिष्ट्यपूर्ण बेडकाच्या प्रजातीचे दर्शन घडल्याने स्थानिक जैवविविधतेच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण नोंद झाली आहे. गो. सी. गावंडे महाविद्यालयातील प्राणिशास्त्रज्ञ तथा नैसर्गिक पर्यावरण संवर्धन संस्थेचे सदस्य प्रा. डॉ. संदीप चेडे यांनी या प्रजातीची अधिकृत ओळख पटवून तिच्या संवर्धनाची आवश्यकता अधोरेखित केली आहे.

नांदेड येथील प्रा. डॉ. विशाल मराठे यांच्या निवासस्थानी हा बेडूक आढळून आला. आकर्षक रंगसंगती आणि वैशिष्ट्यपूर्ण शारीरिक रचनेमुळे त्याने नागरिकांचे लक्ष वेधून घेतले. त्यानंतर हा विषय प्रा. डॉ. संदीप चेडे यांच्याकडे नेण्यात आला. त्यांनी हा बेडूक ‘इंडियन पेंटेड फ्रॉग’ असल्याचे स्पष्ट केले.

ही प्रजाती प्रामुख्याने जमिनीखाली राहणारी असून पाठीवरील आकर्षक रंगछटांसाठी ओळखली जाते. दक्षिण भारत आणि श्रीलंकेतील काही भागांत ती तुलनेने आढळत असली, तरी मराठवाड्यासारख्या निम-ओसाड प्रदेशात तिची नोंद होणे अत्यंत दुर्मिळ मानले जाते. हे बेडूक वर्षातील बहुतांश काळ जमिनीखाली घालवतात आणि मुसळधार पावसानंतर विणीच्या हंगामात तात्पुरत्या पाणथळ भागांमध्ये बाहेर येतात.



शहरी किंवा निम-शहरी परिसरात या प्रजातीचे दर्शन होणे, वन्यजीव बदलत्या पर्यावरणाशी जुळवून घेत असल्याचे द्योतक असल्याचे तज्ज्ञांचे मत आहे. उभयचर प्राणी हे पर्यावरणाच्या आरोग्याचे महत्त्वपूर्ण जैविक संकेतक मानले जात असल्याने अशा नोंदींना विशेष महत्त्व प्राप्त होते.

प्रा. डॉ. संदीप चेडे म्हणाले, “नांदेडमध्ये या दुर्मिळ भुयारी बेडकाचा शोध लागणे म्हणजे स्थानिक परिसंस्थेमध्ये अजूनही समृद्ध जैवविविधता अस्तित्वात असल्याचा पुरावा आहे. मात्र, वाढते शहरीकरण, कीटकनाशकांचा वाढता वापर आणि हंगामी पाणथळ क्षेत्रांचा होत असलेला ऱ्हास यामुळे या प्रजातींच्या अस्तित्वाला गंभीर धोका निर्माण झाला आहे. त्यामुळे स्थानिक सूक्ष्म अधिवासांचे संरक्षण आणि जनजागृती ही काळाची गरज आहे. नैसर्गिक पर्यावरण संवर्धन संस्थेचे प्रभाकर दिघेवार, गजानन रासकर, दीपक ठाकरे, विष्णू दुधेवार, देविदास कानडे आणि राजेश भोकरे आदी पर्यावरणप्रेमींनी या शोधाचे स्वागत केले आहे. या निमित्ताने परिसरातील दुर्लक्षित उभयचर जैवविविधतेचे दस्तऐवजीकरण आणि संवर्धनाला चालना मिळेल, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली.

# तेली समाजाच्या मागण्या मान्य कराव्या - डवले

प्रतिनिधी दि. ३ जुलै




**अकोला:** "तेली समाज हा केवळ एक समाज नसून महाराष्ट्राच्या मातीशी, संस्कृतीशी आणि अर्थव्यवस्थेशी जोडलेला एक अत्यंत प्रामाणिक, कष्टाळू आणि स्वाभिमानी घटक आहे. अंधाराचा नाश करण्यासाठी जशी तेलाच्या दिव्याची गरज असते, तशीच समाजाच्या उन्नतीसाठी संत संताजींच्या विचारांची गरज आहे," असे प्रतिपादन राज्य तेली समाज समन्वय समितीच्या वतीने आयोजित पत्रकार परिषदेत मुंबई येथे करण्यात आले. या परिषदेत समाजाच्या प्रगतीसाठी शिक्षण, संघटन आणि आर्थिक उन्नती या त्रिसूत्रीवर भर देत विविध महत्त्वपूर्ण मागण्या मांडण्यात आल्या. या पत्रकार परिषदेला राज्य तेली समाज समन्वय समिती महाराष्ट्रचे अध्यक्ष प्रकाश डवले, सरचिटणीस प्रशांत शेवतकर , उपाध्यक्ष एड. किशोर लांजेवार गोंदिया, पुणे जिल्हाध्यक्ष हिरामण सांगे, मुंबई जिल्हाध्यक्ष घनश्याम बोराखडे आणि नागपूर जिल्हाध्यक्ष डॉ. अभिजीत डवले , ॲड. संजय शेलोकार नागपूर यांच्यासह मान्यवर उपस्थित होते. पत्रकार परिषदेत वक्त्यांनी तेली समाजाच्या गौरवशाली इतिहासाला उजाळा दिला. छत्रपती शिवाजी महाराजांचे निष्ठावंत मावळे आणि जगद्गुरु संत तुकाराम महाराजांचे विचार आपल्या लेखणीतून जिवंत ठेवणारे 'परमवीर' संत संताजी जगनाडे महाराज हे तेली समाजाचे दैवत आणि आदर्श आहेत, असे सांगत त्यांनी दिलेली प्रामाणिकपणाची व भक्तीची शिकवण आजच्या काळातही तितकीच प्रेरणादायी असल्याचे स्पष्ट केले. विदर्भ, मराठवाड्यासह संपूर्ण महाराष्ट्रात तेली समाज मोठ्या संख्येने असून राज्याच्या राजकारणात आणि जडणघडणीत नेहमीच निर्णायक राहिला आहे, याकडेही त्यांनी लक्ष वेधले. आधुनिकतेच्या युगात पारंपरिक व्यवसाय संकटात सापडल्याने आणि तरुण पिढी शिक्षणासाठी संघर्ष करत असल्याने, शासनाने खालील मागण्या त्वरित पूर्ण कराव्यात अशी मागणी करण्यात आली. ग्रामीण भागातील मुला-मुलींना उच्च शिक्षणासाठी मुंबई, नागपूर आणि पुणे यांसारख्या मोठ्या शहरांमध्ये हक्काची आणि परवडणाऱ्या दरातील वसतीगृहे उपलब्ध करून देण्यात यावीत, शासनाने जाहीर केलेले 'संत संताजी जगनाडे महाराज आर्थिक विकास महामंडळाला भरीव निधी देऊन तातडीने कार्यान्वित करावे. पारंपरिक तेल घाणी उद्योगाला आधुनिक तंत्रज्ञानाची जोड देण्यासाठी शासनाने विशेष अनुदान योजना सुरू करावी. असे राज्य तेली समाज समन्वय समिती अध्यक्ष प्रा. प्रकाश डवले म्हणाले.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक प्रदीप पुंडलिकराव देशमुख यांनी भास्कर प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड प्लॉट क्र. टी- ५१ एम. आय. डी. सी. फेज - ४, अकोला ग्रोथ सेंटर, येवता रोड, शिवणी, अकोला - ४४४००२ येथे मुद्रित करून सिटी न्यूज सुपरफास्ट कार्यालय, उत्सव संकुल, गांधी रोड, अकोला येथे प्रकाशित केले. ■ **मुख्य संपादक : प्रदीप पुंडलिकराव देशमुख** ■ संपर्क - ०७२४ - २४३५५७३, २४४४७७४ ■ email- citynewss80@gmail.com, RNI No.- MAHMAR/ 2012 / 49642, RRC Helpline No. 8484842135